डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

माहे डिसेंबर-२०२५

वर्ष १ ले, अंक ८ वा



डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ८ वा

**मुख्य संपादक**

**डॉ. देवेंद्र सुरेश जाधव**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११०६७

**सहसंपादक**

**डॉ. प्रशांत दयाराम भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन, तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे- ४११०६७

**संकलन, संपादन, मांडणी व सजावट:**

**श्री. संतोष शिवराम पवार,** पशुधन पर्यवेक्षक
**'महापशुधन वार्ता' कक्ष,**
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-४११०६७

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**

**महापशुधन वार्ता कक्ष**
**पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**औंध, पुणे - ४११०६७**

**020-25690484**

Email:
mahapshudhanvarta@gmail.com

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७


## पशुसंवर्धन विभाग

**मागील अंक वाचण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा**

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

## या अंकात...


- अरविंद यशवंत पाटील यांना गोपालरत्न पुरस्कार प्रदान
- श्रद्धा ढवण यांना राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार
- विविध शासकीय अधिकारी व शास्त्रज्ञांची देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट
- आदिवासी पाड्यावरील शेळीग्रामला मा. सचिव (पदुम) यांची भेट
- लम्पीच्या 'महाराष्ट्रीय लसी'ची यशस्वी चाचणी
- राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्राला मा. आयुक्तांची सदिच्छा भेट
- पशुसंवर्धन विभागातंर्गत विविध घटना व घडामोडी
- रावेर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयात किंगकोब्रावर यशस्वी शस्त्रक्रिया
- तरुण खिल्लार बैलाचे प्राण वाचवणारी यशस्वी शस्त्रक्रिया
- जळालेल्या नायलॉन दोरीचा तुकडा म्हशीच्या अन्ननलिकेत अडकला, यवतमाळ जिल्हा पशुवैद्यकीय रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया
- पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणातून पशुसंवर्धन क्षेत्राच्या विकासासाठी विभागाने आरंभलेले प्रयत्न (AHIDF)
- पशुधन आरोग्य व रोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत, पशु औषधी विक्री केंद्र
- भटक्या श्वानांचा प्रश्न: शहरी आणि ग्रामीण भागासाठी शासनाच्या महत्वपूर्ण सूचना
- वराहातील क्लासिकल स्वाईन फीव्हर (CSF) आजाराचे लक्षणे, निदान व प्रतिबंध
- ओझोन प्रक्रिया: पशुपालन व्यवसायात ओझोन प्रक्रियेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांसाठी व्यावसायिक संधी
- देशी कुक्कुटपालनातून उद्योजकता विकास समीर इस्माईल शेख यांचे यशस्वी कुक्कुटपालन
- डांगी जनावरांची जोपासना
- शेळी उत्पादनाचे फायदे
- हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादन
- माकड / वानर संघर्ष कमी करणेसाठी शासकीय कार्यपद्धती
- '१९६२-MVU महाराष्ट्र चॅटबॉट: महाराष्ट्र पशुसंवर्धन क्षेत्रातील डिजिटल क्रांती
- पशुसंवर्धन शब्दसंग्रह



# अरविंद यशवंत पाटील यांना गोपालरत्न पुरस्कार प्रदान

केंद्रीय पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे सर्वोत्कृष्ट पशुपालक म्हणून देण्यात येणारा पहिल्या क्रमांकाचा 'गोपालरत्न' पुरस्कार नानीबाई चिखली (जि. कोल्हापुर) येथील अरविंद यशवंत पाटील यांना बुधवार दि. २६ नोव्हेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय दूध दिनानिमित्त नवी दिल्लीमध्ये आयोजित एका शानदार कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. अरविंद पाटील यांना मा. केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायमंत्री राजीव रंजन सिंह, राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते पाच लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह तसेच प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

अरविंद पाटील यांनी १९९६ मध्ये सुरुवातीला कर्ज काढून पाच गायीपासून मुक्तसंचार गोठा सुरू केला होता. आजमितीस त्यांच्या गोठ्यात मुऱ्हा प्रजातीच्या ७० म्हशी, एचएफ २०, गीर व इतर जातीच्या गायी ४० असे एकूण १३० च्या वर पशुधन आहे. दररोज प्रती दिन साधारणपणे ६०० लिटरपर्यंत दूध संकलन होते. दहा एकरांमध्ये पौष्टिक चाऱ्याची लागवड करण्यात आली आहे. बहुतांशी जनावरे घरची तयार केली आहेत. ब्रिडिंगवर सातत्याने काम चालते. मिल्कींग मशीन, मुक्तसंचार गोठा, सायलेज, सोलर पॅनेल या बाबींचा अंतर्भाव त्यांनी व्यवसायात करुन उत्पादन खर्चात बचत साधली आहे. तसेच दुधासोबत इतर दुग्धजन्य उपपदार्थही तयार करुन त्यांची विक्री केली जात आहे. आतापर्यंत पाटील यांना जिल्हा परिषदेचा आदर्श गोठा पुरस्कार, पाच वेळा गोकुळ श्री पुरस्कार तसेच विविध संस्था, संघटना यांचेकडून मानपत्र देऊन गौरवण्यात आले आहे.



# श्रद्धा ढवण यांना राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार




मेहनतीला कधीच 'वय' आड येत नाही. कोणतेही काम पूर्ण करण्यासाठी कोणत्याही अनुभवाची गरज नसते. गरज असते ती मेहनतीची! काम करण्याची जिद्द आणि त्या कामावर आपली 'श्रद्धा' असली, की कोणतीच गोष्ट अशक्य नसते. हीच गोष्ट करून दाखवली आहे, महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील निघोज गावातल्या 'श्रद्धा ढवण' यांनी वयाच्या अवघ्या १०व्या वर्षापासून सुरु झालेल्या कौटुंबिक दुग्धव्यवसायाचा विस्तार श्रद्धा ढवण यांनी कैक पटीने वाढवला आहे. २ म्हशींपासून आज ८० म्हशींपर्यंत दुग्धव्यवसाय वाढवण्याचे काम श्रद्धा यांनी "श्रद्धा डेअरी फार्म"अंतर्गत केले आहे.

श्रद्धा ढवण यांच्या याच कार्याची दखल घेत मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या अखत्यारीतील पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाने त्यांना राष्ट्रीय गोपालरत्न पुरस्कार (NGRA) जाहिर करत दि. २६ नोव्हेंबर २०२५ (राष्ट्रीय दूध दिन) रोजी दिल्ली येथे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यानिमित्त अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आनंद भंडारी यांच्या हस्ते श्रद्धा यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उभयतांनी श्रद्धा ढवण यांचे अभिनंदन करून ढवण यांना योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल पशुसंवर्धन विभागाची प्रशंसा केली. याप्रसंगी जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. दशरथ दिघे, डॉ. मुकुंद राजळे, डॉ. नांदे, डॉ. संतोष पालवे आदी उपस्थित होते. आपल्या अनुभवाच्या बळावर मिळवलेले ज्ञान श्रद्धाने स्वतःपर्यंत मर्यादित न ठेवता पशुपालन व दुग्धव्यवसाय करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी प्रशिक्षण केंद्राची उभारणी केली. श्रद्धाचे व्यवसायातील यश पाहून अनेकांना प्रेरणा मिळत असून, युवकांचा दुग्धव्यवसाय करण्याकडे कल वाढत आहे.

# विविध शासकीय अधिकारी व शास्त्रज्ञांची देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट




**पुणे:** कृषी महाविद्यालय, पुणे येथे दि. १८ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित नैसर्गिक शेती कार्यशाळेनिमित्त विविध मान्यवर अधिकारी व शास्त्रज्ञांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन प्रकल्पाचा सखोल आढावा घेतला.

कार्यशाळेतंर्गत दुपारच्या सत्रात झालेल्या या भेटीदरम्यान मान्यवरांनी केंद्रातील प्रगत कार्यपद्धती, संशोधन उपक्रम आणि शाश्वत देशी गोपालनासाठी राबविण्यात येणाऱ्या नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची माहिती घेतली. प्रकल्पात विकसित केलेल्या भारतातील आदर्श व शाश्वत देशी गोपालन मॉडेलची पाहणी करताना त्यांनी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या सर्वांगीण कामाचे कौतुक केले. प्रकल्पामध्ये असणाऱ्या भारतातील सर्वाधिक दूध देणाऱ्या सहिवाल, गीर, थारपारकर, राठी, रेड सिंधी या देशी गाईंच्या जातींची तसेच महाराष्ट्रातील स्थानिक सहा जाती यासोबतच भारतातील सर्वात लहान देशी गाय पुंगनूर याविषयीची माहिती त्यांनी जाणून घेतली.

भ्रूण प्रत्यारोपण (ET-IVF) तंत्रज्ञानाद्वारे तयार झालेल्या उच्च प्रतीच्या गोवंश, तसेच गोपिक्रमा, नैसर्गिक शेतीपूरक विविध पद्धती, पशुपालन व्यवस्थापन मॉडेल आणि प्रकल्पाने विकसित केलेल्या आधुनिक मोबाईल ॲप्लिकेशन्सची पाहणी करताना या प्रकल्पाने तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत कृषी-गोपालन क्षेत्रात उभारलेला मार्गदर्शक पायंडा सर्वांनी विशेष कौतुकास्पद असल्याचे नमूद केले.

श्री. विकासचंद्र रस्तोगी (अपर मुख्य सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन), डॉ. रामास्वामी एन. (सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग), डॉ. प्रविणकुमार देवरे (आयुक्त, पशुसंवर्धन विभाग), श्री. परिमल सिंग (संचालक, POCRA), डॉ. शरद गडाख (कुलगुरू, महात्मा फुले कृषी विद्यापीठ), डॉ. संजय भावे (कुलगुरू, दापोली विद्यापीठ), डॉ. नितीन पाटील (कुलगुरू, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ), डॉ. के. बी. काठीरिया (कुलगुरू, आनंद कृषी विद्यापीठ, गुजरात), डॉ. रविंद्रसिंग चौहान (कुलगुरू, दांतीवाडा कृषी विद्यापीठ)



आणि डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन विभाग) या सर्व मान्यवरांनी प्रकल्पाच्या कार्यप्रणालीचे कौतुक केले. ही भेट नैसर्गिक शेतीसाठी देशी गाय आधारित संशोधनाचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. आजच्या कृषी व्यवस्थेत मातीचे आरोग्य, उत्पादन खर्च, रासायनिक अवलंबित्व आणि पर्यावरणीय संतुलन या प्रमुख आव्हानांवर मात करण्यासाठी देशी गाय हा केंद्रबिंदू ठरत आहे. देशी गायीचे शेण-गोमूत्र हे नैसर्गिक शेतीतील मूलभूत घटक असून त्यातून तयार होणारे जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत, PROM, गांडूळखत सारखी सेंद्रिय खते आणि जैविक द्रावणे शेतीला स्वयंपूर्ण, विषमुक्त आणि शाश्वत बनवतात.मान्यवरांनी पाहणीदरम्यान नमूद केले की, देशी गाय आधारित संशोधनामुळे कृषी क्षेत्राला नवी दिशा मिळत आहे. देशी गायीच्या स्थानिक जातींचे संवर्धन, त्यांची उत्पादकता, रोगप्रतिकारकता, माती सुधारण्यासाठी उपयुक्तता व नैसर्गिक शेतीत होणारे फायदे यावर केंद्राचे कार्य निश्चितच मार्गदर्शक ठरत आहे. शाश्वत शेतीसाठी देशी गाय हे 'मूलतत्व' असल्याने अशा प्रकारचे संशोधन ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यात व पर्यावरणपूरक शेतीला प्रोत्साहन देण्यात निर्णायक ठरत आहे.





# आदिवासी पाड्यावरील शेळीग्रामला मा. सचिव (पदुम) यांची भेट



नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वरसारख्या आदिवासी तालुक्यात शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालनासारखे व्यवसाय वैयक्तिक, महिला गट व लाभार्थ्यांच्या माध्यमातून यशस्वी करून त्यांच्या जीवनमानात प्रभावी सुधारणा करणे व स्थानांतरण थांबवणे हे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभाग व आयव्हीआरआयच्या चमूने गत काही वर्षांपासून राबविले आहे. याची पाहणी करताना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.)व पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.). बिरसा मुंडा जयंतीनिमित्त उस्मानाबादी शेळीपालक लाभार्थ्यांच्या भावना जाणून घेत, त्यांची शेळीपालन, कुक्कुटपालन व दुग्धव्यवसायातील प्रगती पाहून मा. सचिव व आयुक्त महोदयांनी समाधान व्यक्त केले. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी क्षेत्रिय स्तरावर आदिवासी बांधवांच्या प्रगती व विकासासाठी आरंभलेले स्थायी स्वरुपाचे प्रयत्न पाहून मा. सचिव महोदयांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. तसेच लाभार्थ्यांना वैरण बियाणांचे वाटपही यावेळी करण्यात आले. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. बाबुराव नरवाडे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रशांत धर्माधिकारी, सहाय्यक आयुक्त डॉ. धांडे, सहाय्यक आयुक्त डॉ. संतोष शिंदे आदी उपस्थित होते.





मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) व पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.), प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नाशिक विभाग डॉ. बाबुराव नरवाडे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रशांत धर्माधिकारी, सहाय्यक आयुक्त डॉ. धांडे यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर रस्त्यावरील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ माहिरावणी ता. जि. नाशिक येथे भेट देऊन दवाखान्यातील तांत्रिक कामकाज, ऑनलाइन लसीकरण, कृत्रिम रेतन, दवाखान्याची स्वच्छता व सुशोभिकरण, विविध विकास योजना याबाबतची माहिती घेतली. तसेच पशुपालकांना चारा बियाणे वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले. संस्थाप्रमुख पशुधन विकास अधिकारी डॉ. आनंदा कुटे यांच्या उत्कृष्ट कामकाजाबद्दल मा. सचिव व मा. आयुक्त महोदयांनी त्यांचे अभिनंदन केले.







राज्यातील शेतकरी आणि पशुपालक यांच्यासह एकूणच जनतेच्या सर्वांगीण हिताचा निर्णय घेत राज्य शासनाने पशुउत्पादकत्ता व गुणवत्तेत वाढ होण्यासाठी एक क्रांतिकारक पाऊल टाकले आहे. गाय व म्हशीमध्ये कृत्रिम रेतनाकरिता गोठीत वीर्य निर्मिती, प्रक्रिया, साठवण, विक्री, वितरण आणि प्रत्यक्ष कृत्रिम रेतन करणे, तसेच सहाय्यक पुनरुत्पादक तंत्र आणि या संबंधित सर्व बाबींसाठीचे नियमन करण्यासाठी राज्यात 'महाराष्ट्र बोव्हाईन ब्रीडिंग अधिनियम' अन्वये महाराष्ट्र गोजातीय प्रजनन विनियमन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून, त्यातंर्गत नाशिक जिल्हा दौऱ्यावर असताना जिल्ह्यातील १७ कृत्रिम रेतन सेवादाता व ०२ कृत्रिम रेत संकलन संस्थांना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांचे हस्ते नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नाशिक विभाग डॉ. बाबुराव नरवाडे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. प्रशांत धर्माधिकारी आदी उपस्थित होते.





# लम्पीच्या 'महाराष्ट्रीय लसी'ची यशस्वी चाचणी

## दिड कोटी गोवंशीय पशुधनाला होणार लाभ



'लम्पी' त्वचा रोगामुळे गोवंशीय पशुधन धोक्यात आले असतानाच, राज्याच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटरनरी बायोलॉजिकल प्रॉडक्ट्स' या संस्थेने (आयव्हीबीपी) 'लम्पी चर्मरोग' स्वदेशी लस विकसित केली आहे. या लसीची क्षेत्रीय चाचणी घेण्याच्या सूचना केंद्र सरकारच्या केंद्रीय औषध मानक नियंत्रण संस्थेने दिल्यानंतर विभागाने सर्व चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या असून, त्याचे निष्कर्ष सकारात्मक आले आहेत. याबाबतचा अहवाल केंद्राकडे पाठवला जाणार असून, या लसीच्या उत्पादनाला लवकरच मान्यता मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. या लसीच्या निर्मितीचा राज्यातील दीड लाख गोवंशीय पशुधनाला लाभ होणार आहे.

राज्यात २०१९ पासून गोवंश पशुधनात मोठ्या प्रमाणात लम्पी या त्वचारोगाची साथ पसरली. मागील पाच-सहा वर्षांत जवळपास पाच लाखांहून अधिक पशुधनाला या आजाराचा फटका बसला. यात आतापर्यंत ७० हजार पेक्षा अधिक पशुधनाचा मृत्यू झाला असून, संबंधित पशुपालकांना सुमारे १०० कोटी रुपयांपेक्षा अधिकची नुकसान भरपाई देण्यात आली आहे. तसेच, या आजाराने दुग्धोत्पादन ३० ते ४० टक्क्यांनी घटले आहे. महत्त्वाचे म्हणजे, या आजाराने बाधित पशुधनाची उत्पादकता कमी झाली असून, पशुपालकही आर्थिक अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे लम्पी आजारावर तत्काळ लस उपलब्ध करण्याची गरज निर्माण झाली आहे.

राष्ट्रीय अश्व अनुसंधान केंद्र आणि भारतीय पशु चिकित्सा अनुसंधान संस्थान या केंद्रीय संस्थांनी 'लम्पी-प्रो-बँक' ही लस विकसित केली. या लसीचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करून ती देशभरात तातडीने पोहोचवण्यासाठी, महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन विभागाच्या 'इन्स्टिट्यूट ऑफ व्हेटरनरी बायोलॉजिकल प्रॉडक्ट्स' पुणे या संस्थेची निवड करण्यात आली. संस्थेला ही लस उत्पादन करण्यासाठी प्रोडक्शन राईट्सही देण्यात आले आहेत. तसेच केंद्रीय पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या उपस्थितीत महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारही करण्यात आला आहे, अशी माहिती सहआयुक्त पशुसंवर्धन, आयव्हीबीपी, पुणे डॉ. याहयाखान पठाण यांनी दिली.



### अहवाल मान्यतेसाठी केंद्राकडे

लसीकरणाबाबत सर्व चाचण्या पूर्ण झाल्या आहेत व संबंधित चाचण्यांचे निष्कर्ष केंद्र शासनाच्या सुगम पोर्टलवर सादर करून महाराष्ट्र राज्याला तत्काळ लम्पी चर्मरोग लसीचा व्यावसायिक उत्पादनाचा परवाना मिळण्यासाठी विनंती करण्यात येणार आहे. सर्वच प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहेत. या लसीचा फायदा राज्यातील दिड कोटी गोवंशीय पशुधनास होणार आहे.

**डॉ. रामास्वामी एन.**
सचिव, पशुसंवर्धन व
दुग्ध व्यवसाय विकास

### शेळ्यांच्या देवी लसीला मान्यता

'आयव्हीबीपी'कडून लम्पी त्वचारोग आणि शेळ्यांच्या आजारांना प्रतिबंध घालण्यासाठी लसनिर्मिती सुरू आहे. यातील शेळ्यांसाठी तयार केलेल्या 'देवी लसी'च्या निर्मितीला केंद्राची मान्यता मिळण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, अशी माहिती सहआयुक्त पशुसंवर्धन, आयव्हीबीपी डॉ. याहयाखान पठाण यांनी दिली आहे.

### अशी झाली चाचणी

प्रायोगिक तत्त्वावर तयार करण्यात आलेल्या लसीची पाच प्रक्षेत्रावर चाचणी करण्यात आली. यात ताथवडे (पुणे), जुनोनी (सोलापूर), जत (सांगली), कोपरगाव (अहिल्यानगर) व पोहरा (अमरावती) या भागांतील ५०० गाय व १०० म्हैसवर्गीय अशा ६०० पशुधनावर चाचण्या सुरू आहेत. यात लसीकरणानंतर शून्य, ३०, ६० आणि १२० दिवसांच्या रक्तजल नमुन्यांची तपासणी केली गेली. याचे निष्कर्ष अत्यंत समाधानकारक असून, यामुळे लस उत्पादनाचा मार्ग मोकळा होणार आहे.

### लम्पी रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम

लम्पी स्कीन डिसीज (LSD) या चर्मरोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत वेळोवेळी लसीकरण मोहीम राबवण्यात येते.

• लक्ष्य: गायवर्गीय जनावरांना (गाई, वासरे, बैल) लम्पी स्कीन रोगापासून वाचवण्यासाठी प्रतिबंधात्मक लसीकरण केले जाते.

• **उद्देश:**
- रोगाचा फैलाव नियंत्रणात आणणे.
- बाधित क्षेत्रापासून ५ किलोमीटरच्या त्रिज्येतील निरोगी जनावरांना लस देणे.
- पशुधनातील मरतुकीचे प्रमाण कमी करणे.

• **कार्यान्वयन:**
- जिल्हा परिषद (ZP) व महानगरपालिका यांच्या सहकार्याने लसीकरण मोहीम राबवली जाते.
- लसीकरण वेगाने केले जाते.
- पशुसंवर्धन विभागामार्फत या रोगाविरुद्ध सातत्याने उपाययोजना करण्यात येत असतात.

# राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्राला मा. आयुक्त पशुसंवर्धन यांची सदिच्छा भेट







**पुणेः** येथील पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र, गोखलेनगर या संस्थेस मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांनी दि. ०६ डिसेंबर, २०२५ रोजी सदिच्छा भेट दिली. यावेळी मा. आयुक्त महोदयांनी पशुधन विकास अधिकारी आणि सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांच्यासाठी आयोजित केलेल्या १३ दिवसीय पायाभूत तांत्रिक प्रशिक्षणाचे निरीक्षण केले व प्रशिक्षणार्थीशी संवाद साधला.

भेटीदरम्यान मा. आयुक्त महोदयांनी प्रशिक्षणाच्या विविध पैलूंची माहिती घेतली. त्यांनी सर्व अधिकाऱ्यांना त्यांच्या नवीन जबाबदाऱ्यांसाठी शुभेच्छा दिल्या आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी उच्च दर्जाच्या प्रशिक्षणाचे महत्त्व त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

### भोजनालयाची विशेष पाहणी

प्रशिक्षणाच्या सोयी-सुविधांची पाहणी करत असताना, मा. आयुक्त महोदयांनी संस्थेच्या प्रशिक्षणार्थी भोजनालयाला विशेष भेट दिली. त्यांनी जेवणाच्या व्यवस्थेचे, गुणवत्तेचे आणि स्वच्छतेचे बारकाईने निरीक्षण केले. उत्तम आणि पौष्टिक जेवण मिळणे हे प्रशिक्षणाच्या यशस्वीतेसाठी महत्त्वाचे आहे, यावर त्यांनी कटाक्षाने भर दिला.

भेटीदरम्यान रा. प्र. केंद्र, गोखलेनगर या संस्थेचे प्राचार्य तथा उपआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत भड, यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांबद्दल व प्रशिक्षणाच्या स्वरूपाबद्दल मा. आयुक्त महोदयांना सविस्तर माहिती दिली. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी उच्च दर्जाचे प्रशिक्षण देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



आयव्हीबीपी (Institute of Veterinary Biological Product) या संस्थेतील २९ पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी यांनी आपले एकदिवसाचे वेतन (₹.१,०६,६८० /-) मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत जमा केले. मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांचेकडे सहआयुक्त पशुसंवर्धन (आयव्हीबीपी) डॉ. याहयाखान पठाण यांनी वेतनाच्या एकत्रित रकमेचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय) डॉ. शैलेश केंडे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, पुणे विभाग डॉ. समीर बोरकर यांचेसह आयव्हीबीपी संस्थेचे पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.




अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ.शितलकुमार मुकणे यांनी छत्रपती संभाजीनगर विभागाची आढावा सभा घेऊन तांत्रिक कामकाजाची प्रागतिक माहिती घेतली. यावेळी डॉ. मुकणे यांनी सर्व जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय यांना लक्ष्यांकित उद्दिष्टपूर्तीसाठी क्षेत्रीय स्तरावर नियोजन करण्यासंदर्भात मार्गदर्शन व आवश्यक निर्देश दिले.




मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांचे निर्देशानुसार, छत्रपती संभाजीनगर येथील पडेगाव फार्म येथे, अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन डॉ. शितलकुमार मुकणे, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्र शाह, MAFSU चे प्राध्यापक डॉ. अतुल ढोक, BAIF चे डॉ. मनोज आवारे आणि आयआयटी मुंबईचे प्राध्यापक यांच्या उपस्थितीत ओझोन-उपचारित सरकी पशुखाद्य (स्टॉक कम्प्लीट फीड) म्हणून शेळ्या आणि गाईंना देण्याच्या विस्तारित चाचण्यांना सुरुवात झाली.






ठाणे जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची सभा मा. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त डॉ. प्रशांत कांबळे यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व महानगरपालिकांद्वारे राबविण्यात येत असलेल्या ॲनिमल बर्थ कंट्रोल योजनेचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी व अधिकारी उपस्थित होते.





नांदेडचे जिल्हाधिकारी मा. श्री. राहुल कर्डिले (भा.प्र.से.) यांनी पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाचा प्रागतिक आढावा घेतला. जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी नांदेड तालुक्यातील नालेश्वर पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रातील रहाटी (बुद्रुख) या गावाला भेट दिली. याप्रसंगी त्यांनी पशुपालक / शेतकरी बांधवांशी संवाद साधला. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाच्या प्रागतिक कार्याचे श्री. कर्डिले यांनी कौतुक केले.





ग्रामीण कुटुंबाला आर्थिक स्थैर्य देणारा दुग्धव्यवसाय हा एकमेव शाश्वत पर्याय असून, कोल्हापुर जिल्ह्यातील सुमारे साडेआठ लाख पशुधन जिल्ह्याच्या अर्थकारणाला मोठी गती देत असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. शासकीय विश्रामगृह येथील राजर्षी शाहू सभागृहात पशुसंवर्धन विभागामार्फत आयोजित 'पशुधनातील संतुलित आहार व वैरण पिकांच्या लागवडीबाबत तांत्रिक मार्गदर्शन' कार्यशाळा आणि वैरण बियाणे वाटप कार्यक्रमाच्या प्रसंगी ते बोलत होते.





दिनांक ११/११/२०२५ रोजी वनविभाग धुळे येथे आयोजित कार्यशाळेत 'मानव व वन्यप्राणी संघर्ष व्यवस्थापन व प्रथमोपचार' या विषयावर वनविभागातील कर्मचारी व अधिकाऱ्यांना पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. बजरंग कांगणे यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी वनविभागातील कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




मा. सर्वोच्च न्यायालयाच्या शहरी भागातील भटक्या श्वानांसंदर्भातील निर्णय व निर्देशांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने, तसेच मुंबई परिसरातील भटके प्राणी-मानव संघर्ष टाळणे आणि प्राणी संरक्षण अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने, दिनांक २५/११/२०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या आदेशानुसार मौजे मालवणी, मालाड (प), ता. बोरिवली येथील ५ एकर जागा श्वानगृहाकरिता उपलब्ध करून देण्याबाबत आमदार मनीषा चौधरी यांच्या अर्जानुसार जागा पाहणी करण्यात आली. सदर पाहणीदरम्यान डॉ. स्मिता जितूरकर (उपायुक्त पशुसंवर्धन, गुणनियंत्रण प्रयोगशाळा, आरे कॉलनी, मुंबई), डॉ. सचिन कुलकर्णी (सहाय्यक महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह), डॉ. अमर येरोळकर (वरिष्ठ पशुवैद्यकीय अधिकारी, देवनार पशुवधगृह), श्री. विक्रम राणे (सहाय्यक अभियंता, देवनार), डॉ. मोहम्मद अली (पशुवैद्यकीय अधिकारी), श्री. विशाल चौधरी (पी-पश्चिम वॉर्ड); तसेच श्री. अमोल जाधव (भू-अभिलेख कार्यालय, गोरेगाव) हे अधिकारी उपस्थित होते.




जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २० २५- २६ अंतर्गत वैरण बियाणे पशुपालकांना प्रातिनिधीक स्वरुपात वाटप करताना हिंगोली जिल्हा परिषदेचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड (भा.प्र.से.)

भारतात रोग नियंत्रण व महामारी तयारीसाठी वन हेल्थचे एकत्रीकरण या महत्त्वपूर्ण थीमवर केंद्रित, नॅशनल वन हेल्थ मिशन कॉन्क्लेव्ह- २०२५ या दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन दि. २० व २१ नोव्हेंबर २०२५ रोजी भारत मंडपम् कन्व्हेन्शन सेंटर, नवी दिल्ली येथे करण्यात आले आहे. या परिषदेसाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय (रोगनियंत्रण) डॉ. भगतसिंग कदम, पशुधन विकास अधिकारी ( रोग अन्वेषण विभाग) डॉ. संजय पवार सहभागी झाले आहेत.







**सांगली:** जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची सभा २४ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी श्री. अशोक काकडे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सांगली श्री. विशाल नरवाडे (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली. यावेळी भटक्या, मोकाट कुत्र्यांचे योग्य ठिकाणी पुनर्वसन करावे तसेच त्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण करावे व रेबीज संशयित कुत्र्यांवर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून उपाययोजना करण्यासाठी सूचना देण्यात आल्या.



दि. २१/११/२०२५ रोजी पाटणे (ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) येथे पशुसंवर्धन विभागामार्फत पशुपालक महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. सहायक आयुक्त डॉ. शाम कोळेकर यांनी गाभण जनावरांची योग्य काळजी, स्वच्छता व आरोग्य व्यवस्थापन, जनावरांतील वंध्यत्व समस्या व उपाययोजना, गाभण जनावराच्या शेवटच्या महिन्यात व प्रसूतीनंतरच्या पुढील २ महिन्यांत काळजी या मुद्यांवर सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमावेळी डॉ. रितेश शिंदे (पविअ, बांबवडे) उपस्थित होते.

# मुळशीत 'पशुपालकांसाठी आरोग्य प्रशिक्षण शिबिर' उत्साहात

## ४६ पशुपालकांचा सहभाग; तज्ज्ञांकडून रोग व स्वच्छतेवर मार्गदर्शन




**मुळशी, जि. पुणे:** जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती मुळशी आणि मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी पंचायत समिती सभागृहात 'प्राण्यांपासून पशुपालकांना होणारे आजार' या महत्त्वाच्या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात तालुक्यातील ४६ पशुपालकांनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाला सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्साल, औंध) डॉ. बाळासाहेब गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच, पशुपालकांना मार्गदर्शन करण्यासाठी मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विलास वैद्य, सहयोगी प्रा. डॉ. जगदीश गुडेवार आणि नवोन्मेषित व्यावसायिका कु. वृषाली कदम उपस्थित होते. पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. सोनल हिंगाडे, पशुधन विकास अधिकारी डॉ. प्रिया बागडे, डॉ. स्नेहा थोरात, डॉ. अनिल भोसले, डॉ. वृषाली म्हस्के किरण सरोदे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

डॉ. गायकवाड यांनी पशुपालकांना मोलाचे मार्गदर्शन केले, तसेच त्यांच्या शंकांचे निरसन करून प्रश्नांची सविस्तर उत्तरे दिली. "पशुधन हे शेतकऱ्याचे मोठे भांडवल आहे. त्यामुळे या धनाचे व स्वत:चे आरोग्य जपण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण घेणे व तज्ज्ञांच्या सल्ल्याचे पालन करणे आवश्यक आहे," असे मत डॉ. गायकवाड यांनी यावेळी व्यक्त केले.

उपस्थित सर्व तज्ज्ञ मान्यवरांनी शेतकऱ्यांना जनावरांमधील विविध आजार, त्यांचे मानवामध्ये होणारे संक्रमण (Zoonotic Diseases) आणि त्यांच्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना याविषयी सखोल माहिती दिली. पशुपालकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत, जनावरांची काळजी घेण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

सूत्रसंचालन पशुधन विकास अधिकारी डॉ. शैलजा खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात रोहिणी लडकत, श्री. महेश निकम, दिनेश अहीरे, बाळासाहेब ढमाले आदिंनी मोलाची भुमिका बजावली. ज्येष्ठ पशुवैद्यक डॉ. श्रीपाल वर्धमान यांचेही कार्यक्रमास मार्गदर्शन लाभले. मुळशी तालुक्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाने एकत्र येऊन 'टीम वर्क' च्या माध्यमातून हा कार्यक्रम अत्यंत उत्कृष्टरित्या पार पाडला.

# रावेर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयात किंगकोब्रावर यशस्वी शस्त्रक्रिया

## वन्यजीव संरक्षणातील एक आदर्श प्रयत्न

जंगली प्राण्यांवर उपचार करणे आव्हानात्मक व आवश्यक सुविधाही जेमतेम असतानाही, रावेर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयाच्या पशुवैद्यकांनी अलीकडेच दाखवलेल्या संवेदनशीलतेने व कौशल्याने एक महत्त्वपूर्ण उदाहरण निर्माण केले आहे. रावेर येथे २८ नोव्हें. २०२५ रोजी जखमी किंगकोब्रा सापावर केलेली शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी ठरली.

स्थानिकांच्या माहितीनुसार, हा किंगकोब्रा वाघोड येथील महादेव मंदिरातील शिवलिंगावर अनेक वर्षांपासून नियमितपणे दिसून येतो. मंदिर परिसरात फिरत असतानाही त्याने कधीही कोणाला दंश केलेला नाही. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये या सापाबद्दल एक वेगळा भावनिक व धार्मिक आदर आहे. परंतु, अलीकडेच झालेल्या मुंगसाच्या हल्ल्यात त्याच्या जबड्याला गंभीर इजा झाली, तसेच पाठीवर खोल जखमा झाल्या.स्थानिक सर्पप्रेमींनी तात्काळ सापाला रावेर पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयात आणले. तपासणीदरम्यान एक्स-रेमध्ये जबड्याच्या हाडाचे फ्रॅक्चर स्पष्ट दिसून आले. वन्यजीवांसाठी अत्यंत जटिल मानल्या जाणाऱ्या या शस्त्रक्रियेसाठी तालुका पशुसर्वचिकित्सालयातील अनुभवी पशुधन विकास अधिकारी डॉ. रणजीत पाटील, डॉ. स्नेहल मोटेगांवकर आणि डॉ. स्वरूप लिंगायत यांनी तत्परतेने पुढाकार घेतला.

जवळपास दोन तास जनरल ॲनेस्थेशियाखाली राहिल्यानंतर शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली. साप शुद्धीवर येताच तो पुन्हा हालचाल करू लागला. एक जंगली, विषारी आणि संवेदनशील प्राणी अशा स्थितीत पुन्हा सक्रिय होणे ही पशुसर्वचिकित्सालयातील अनुभवी पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या कौशल्याची साक्ष देणारी बाब ठरली. मांडूळ सापावर अशाच प्रकारची शस्त्रक्रिया यापुर्वी यशस्वीरित्या पार पाडण्यात आली आहे. पशुवैद्यकीय विज्ञान व स्थानिक नागरिकांच्या सहकार्याचा हा सुंदर संगम वन्यजीव संरक्षणासाठी पथदर्शी ठरला आहे. सर्पप्रजाती पर्यावरणीय संतुलनासाठी महत्त्वाच्या असून, संरक्षणासाठी अशा उपचारसेवा उपलब्ध असणे आवश्यक आहे.





# तरुण खिल्लार बैलाचे प्राण वाचवणारी यशस्वी शस्त्रक्रिया





महाराष्ट्रातील खिल्लार हा देशी पशुधनातील एक सर्वाधिक लोकप्रिय गोवंश आहे. अत्यंत कणखर आणि ताकदवान पशुधन म्हणून खिल्लार गोवंशाचे वैशिष्ट्य आहे. भिवंडी तालुक्यातील सोनाले गावातील श्री. गणेश चौधरी यांच्या मालकीच्या केवळ १८ महिन्यांच्या खिल्लार बैलावर अलीकडेच मोठे संकट कोसळले. पहाटेच्या सुमारास झालेल्या अपघातात या बैलाच्या पुढील डाव्या पायातील कॅनन बोनला गंभीर स्वरूपाचे कंपाऊंड फ्रॅक्चर झाले. इतकेच नव्हे तर हाडाचे काही तुकडे त्वचेच्या बाहेरही आले होते, ज्यामुळे संसर्गाचा मोठा धोका निर्माण झाला होता.

घटनास्थळावरून तातडीने पशुवैद्यकीय उपचारांसाठी बैलाला नेण्यात आले. प्रथम एक्स-रे तपासणी करून इजा किती खोलवर पोहोचली आहे याचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन फायबरग्लास कास्टच्या साहाय्याने बाह्य स्थिरीकरण (External Fixation) करण्यात आले. याचबरोबर, जखमेची नियमित ड्रेसिंग करता यावी म्हणून कास्टमध्ये विशेष व्हेंट ठेवण्यात आला, हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा होता.

याचदिवशी संध्याकाळी कोळे (तालुका कल्याण जि. ठाणे) येथील पशुधन विकास अधिकारी **डॉ. श्रवण सिंह** यांनी अत्यंत कुशलतेने शस्त्रक्रिया पूर्ण केली. कंपाऊंड फ्रॅक्चर सारख्या जटिल प्रकरणात अशा शस्त्रक्रिया वेळेत आणि योग्य पद्धतीने होणे हे पशूच्या जीवासाठी निर्णायक ठरते. डॉ. सिंह व त्यांच्या टीमच्या प्रयत्नांमुळे या खिल्लार बैलाचे प्राण वाचले आणि त्याच्या पुढील उपचारांची यशस्वी सुरुवात झाली.

श्री. गणेश चौधरी यांच्यासाठी हा बैल केवळ एक जनावर नसून त्यांच्या शेती व्यवसायाचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे हा उपचार त्यांच्यासाठी आर्थिक व मानसिक दोन्ही दृष्टिकोनातून दिलासा देणारा ठरला आहे. या प्रकरणातून वेळेवर उपचार, कुशल शल्यचिकित्सा, तसेच आधुनिक पशुवैद्यकीय तंत्रज्ञान यांचे महत्त्व अधोरेखित होते. योग्य काळजी घेतल्यास अपघातग्रस्त जनावरांचे आरोग्य पुन्हा सक्षम होऊ शकते, हे या यशस्वी उपचारातून स्पष्ट दिसते. तथापि, अपघातांपासून आपल्या पशुधनाचे संरक्षण होईल, याची काळजी प्रत्येक पशुपालकाने घेणेही तितकेच महत्वाचे आहे.

# जळालेल्या नायलॉन दोरीचा तुकडा म्हशीच्या अन्ननलिकेत अडकला

# यवतमाळ जिल्हा पशुवैद्यकीय रुग्णालयात यशस्वी शस्त्रक्रिया





यवतमाळ जिल्ह्यातील जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालयात अलीकडेच एक अत्यंत क्लिष्ट शस्त्रक्रिया करत पशुवैद्यकांनी एका गाभण म्हशीचे प्राण वाचवले.

यवतमाळ शहरानजीक पिंपळगाव परिसरात श्री. शंकर तोंडरे यांचा १७ म्हशींचा गोठा आहे. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे तीन वाजता त्यांच्या ९ महिन्यांच्या गाभण म्हशीला अचानक श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. डाव्या बाजूचे पोट वायूमुळे प्रचंड फुगले होते, सतत पाणी गळत होते, चारा-पाणी घेणे बंद झाले होते आणि म्हैस तोंड उघडे ठेवून श्वास घेत होती. ती जोरजोराने खोकून तोंडातून काहीतरी बाहेर काढण्याचा वारंवार प्रयत्न करीत होती.

सदर गंभीर स्थितीची जाणीव होताच पशुपालकाने तत्काळ सकाळी ६ वाजता डॉ. प्रसाद मनोहरराव खोडवे (पशुवैद्यकीय अधिकारी, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय यवतमाळ), यांच्याशी संपर्क साधला. सकाळी ७ वाजता म्हैस रुग्णालयात दाखल करण्यात आली. क्ष-किरण (X-ray) आणि सोनोग्राफीद्वारे तपासणी केली असता, सुमारे ९ सें.मी. लांबीचा जळालेल्या नायलॉन दोरीचा तुकडा म्हशीच्या अन्ननलिकेच्या मागील भागात घट्ट अडकलेला आढळला.

गाभण असल्यामुळे, पोटातील प्रचंड फुगारा आणि अन्ननलिकेतील अडथळा यामुळे म्हैस अत्यंत गंभीर स्थितीत होती. त्यामुळे सुट्टीचा दिवस असूनही तातडीची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आला. सकाळी ७.५० वाजता शस्त्रक्रिया सुरू करण्यात आली. तज्ज्ञांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने अन्ननलिकेत अडकलेला नायलॉन तुकडा बाहेर काढला. काही वेळातच म्हशीचा श्वासोच्छ्वास सामान्य झाला आणि पोटाचा फुगारादेखील कमी होत असल्याचे आढळले. शस्त्रक्रियेनंतर १२ तासांनी फक्त पाणी, २४ तासांनी पाण्यात भिजवलेला नरम चारा देण्याची सूचना पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी केली. त्याचबरोबर, पुढील दिवशी झालेल्या सोनोग्राफी तपासणीत गर्भ सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाले, ही पशुपालकांसाठी दिलासादायक बाब ठरली.

ही क्लिष्ट शस्त्रक्रिया डॉ. मंगेश काळे, जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभाग, यवतमाळ, डॉ. सुहास अलोणे, सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, यवतमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रसाद मनोहरराव खोडवे, डॉ. किशोर बनसोड, डॉ. अनुप भावेकर व डॉ. डॉ. अमेय गुप्ते आदी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

पशुपालकांनी गोठ्यातील गव्हाणी, चारा विभाग आणि दोऱ्यांचा सुरक्षित वापर, याकडे विशेष लक्ष देणे किती आवश्यक आहे, हे या घटनेतून अधोरेखित होते. जि.प.स.चि. येथील अधिकाऱ्यांच्या दक्षतेमुळे एका गाभण म्हशीचे प्राण वाचले आणि तिचा गर्भही सुरक्षित राहिला. आधुनिक यंत्रणा, शास्त्रोक्त उपचारपद्धती व पशुवैद्यकांच्या कुशलतेमुळे ग्रामीण भागातील पशुधनास मिळणारी सेवा अधिक बळकट होत आहे.

लोकमत

# तापमान उतरले; नवजात वासरे, दुभत्या जनावरांची जोखीम वाढली

## वाढत्या थंडीमुळे जनावरांची घ्या काळजी

लोकमत न्यूज नेटवर्क

लातूर : अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे किमान तापमान उतरत आहे. दरम्यान, हवामान विभागाने नोव्हेंबरच्या उत्तरार्धात थंडीची लाट जाणवू शकते, असा अंदाज वर्तविला आहे. पशुधनास तो धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पशुपालकांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे.

दोन-तीन दिवसांपासून तापमानात घट होऊन थंडी अधिक जाणवत आहे. थंडीची लाट आल्यास शरीराचे तापमान कमी होते. त्यातून पशुधनास हायपोथर्मिया, श्वसनाचे आजार, दूध उत्पादनात घट आणि अचानक मृत्यूही होऊ शकतो. नवजात वासरे, अशक्त आणि दुभती जनावरे या काळात सर्वाधिक जोखमीच्या गटात येतात.

## पशुपालकांनी हे टाळणे अत्यंत महत्त्वाचे...

जनावरांना थंडीत उघड्यावर बांधू नका. थंड पाणी देऊ नका. ओलसरपणा आणि धूर टाळा. थंडीच्या काळात पशुमेळावे व प्रदर्शने टाळा. मृत जनावरांची विल्हेवाट स्वच्छतेने, पाणवठ्यांपासून दूर करा.



## ही लक्षणे दिसताच तत्काळ सल्ला घ्या

जनावरांत थरथर, सुस्ती, अन्न न खाणे, श्वास घेण्यास त्रास, त्वचा काळसर पडणे, दूध उत्पादन घटणे अशी लक्षणे दिसल्यास तत्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा. सरकारी रुग्णालयांत आवश्यक औषधे उपलब्ध आहेत.

**१५**
अं. से. किमान तापमान रविवारी होते.

> थंडीची लाट ही नैसर्गिक आपत्ती असली तरी तिचा परिणाम कमी करणे आपल्या हातात आहे. वेळेवर तयारी, गोठ्यातील व्यवस्थापन आणि पशुवैद्यकीय सल्ल्याच्या पालनामुळे आपले पशुधन सुरक्षित ठेवू शकतो.
>
> **डॉ. श्रीधर शिंदे,**
> जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग

## थंडीपासून बचाव करण्यासाठीचे उपाय...

गोठ्याभोवती पडदे लावावेत, पत्र्याच्या छपरावर वाळलेले गवत पसरावे. जमिनीवर वाळलेला चारा अथवा कडब्याचा थर ठेवावा. थंडी फार वाढल्यास गोठ्यात बल्ब वापरावा. धूर निर्माण होणार नाही, याची काळजी घ्या.

**पशुधनास दिवसातून ३ ते ४ वेळा कोमट पाणी द्यावे. पूरक खाद्य, खनिज मिश्रण, मीठ व जीवनसत्त्वांचा वापर करून जनावरांना संतुलित आहार द्या.**

गोठा कोरडा ठेवावा. ओलावा व धूर टाळा. गोठ्यात तुळस, लेमनग्रास किंवा दनरूडी यांच्या जुड्या लटकवल्यास कीटक दूर राहतात.

**लाळ खुरकत, घटसर्प, पीपीआर, एफएमडी, बीक्यू, एचएस यांसारख्या रोगांविरुद्ध लसीकरण करा. कृमी नियंत्रणासाठी वेळोवेळी औषधे द्या.**

नवजात वासरे, अशक्त, दुभती व आजारी जनावरांना उबदार ठिकाणी ठेवा.

**रानात जनावरे ठेवू नका. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवा. पक्ष्यांना कोमट पाणी व पौष्टिक खाद्य द्या.**

---

पुरोगामी विचाराचे
एकमत

page- 8
10 Nov 2025

# थंडीपासून जनावरांचा बचाव करावा

## थंडीच्या लाटेची शक्यता

### लातूर जिल्हा पशुसंवर्धन विभागाचे पशुपालकांना आवाहन

लातूर : प्रतिनिधी

अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे लातूर जिल्ह्यात तापमान झपाट्याने कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार नोव्हेंबरच्या उत्तरार्धात थंडीची लाट जाणवू शकते. ही स्थिती विशेषतः ग्रामीण भागातील पशुधनासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या जनावरांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांनी केले आहे.

जनावरांच्या शरीराचे तापमान कमी झाल्यास त्यांना हायपोथर्मिया, श्वसनाचे आजार, दूध उत्पादनात घट, आणि अचानक मृत्यू यांसारख्या घटना घडू शकतात. नवजात वासरे, अशक्त आणि दुभती जनावरे या काळात सर्वाधिक जोखमीच्या गटात येतात. या जनावरांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी जनावरांना उबदार निवारा तयार करावा. गोठ्याभोवती पडदे लावावेत, पत्र्यांच्या छपरावर वाळलेले गवत पसरावे. जमिनीवर वाळलेला चारा किंवा कडब्याचा थर ठेवावा. थंडी फार वाढल्यास गोठ्यात कृत्रिम प्रकाश किंवा बल्ब वापरावा. धूर निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी.



जनावरांना थंड पाणी देऊ नये, दिवसातून ३ ते ४ वेळा कोमट पाणी द्यावे. पूरक खाद्य, खनिज मिश्रण, मीठ, व जीवनसत्त्वांचा वापर करून जनावरांना संतुलित आहार द्यावा. अशक्त आणि गाभण जनावरांना अतिरिक्त पौष्टिक खाद्य द्यावे जनावरांचा गोठा कोरडा ठेवावा, तसेच दररोज साफ करा वा. ओलावा व धूर टाळावा, गोठ्यात तुळस, लेमनग्रास किंवा दनरूडी यांच्या जुड्या लटकवल्यास कीटक दूर राहतात. लाळखुरकुत, घटसर्प, पीपीआर, एफएमडी, बीक्यू, एचएस यांसारख्या रोगांविरुद्ध लसीकरण करून घ्यावे. कृमी नियंत्रणासाठी वेळोवेळी औषधे द्यावीत. आवश्यक औषधे, सलाईन आणि इलेक्ट्रोलाइट्सचा साठा तयार ठेवावा.

नवजात वासरे, करडी, अशक्त, दुभती व आजारी जनावरे यांना उबदार ठिकाणी ठेवावे. रानात जनावरे ठेवू नयेत, त्यांच्यासाठी उबदार शेड तयार करावे. मेंढ्यांची लोकर कापणी थांबवावी. कोंबड्यांच्या शेडला रात्री पडदे लावावेत आणि तापमान २१ व २२ अंश सेल्सीअस ठेवावे. पक्ष्यांना कोमट पाणी व पौष्टिक खाद्य द्यावे,.

जनावरांमध्ये थरथर, सुस्ती, अन्न न खाणे, श्वास घेण्यास त्रास, त्वचा काळसर पडणे, दूध उत्पादन घटणे अशी लक्षणे दिसल्यास तत्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधा. सरकारी रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधे व तज्ज्ञ कर्मचारी उपलब्ध आहेत. थंडीची लाट ही नैसर्गिक आपत्ती असली तरी तिचा परिणाम कमी करणे आपल्या हातात आहे. वेळेवर तयारी, गोठ्यातील व्यवस्थापन, आणि पशुवैद्यकीय सल्ल्याचे पालन यामुळे आपण आपले पशुधन सुरक्षित ठेवू शकतो, असे डॉ. शिंदे यांनी म्हटले आहे.

---



नांदेड : शेतकरी व पशुपालकांशी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी संवाद साधला. यावेळी पशुधनाबाबत माहिती घेताना.

# जिल्हाधिकाऱ्यांनी साधला पशुपालकांशी संवाद

नांदेड ता.१४ : नांदेड तालुक्यातील नाळेश्वर पशुवैद्यकीय दवाखानाच्या कार्यक्षेत्रातील राहाटी (बु.) या ...

... करतात याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. नांदेड जिल्ह्यात सुरू होणाऱ्या विदर्भ व मराठवाडा ...

... उभारणीच्या उपक्रमाचा पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. पशुसंवर्धन विभागामार्फत नांदेड जिल्ह्यात कृत्रिम रेतनाचे प्रमाण दुप्पट करण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या नियंत्रित प्रजनन कार्यक्रमाच्या कामाची पाहणी त्यांनी केली. या अनुषंगाने 'एक गाव एक फार्म' गृहीत धरुन हा प्रकल्प राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. भेटीदरम्यान कर्डीले यांनी मराठवाडा दूध उत्पादक कंपनीचे सहायक ज्ञानोबा बोकारे, माधव मारोती बोकारे आणि दिगंबर केशवराव बोकारे यांच्याशी संवाद साधला व त्यांच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. राजकुमार पडिले, पशुधन विकास अधिकारी ...

---

पुढारी

# पशुपालकांना मिळणार सवलतीच्या दरात वीज

## जिल्हा उपायुक्तांकडे नोंदणी करणे बंधनकारक

सोलापूर : पुढारी वृत्तसेवा

पशुपालन व्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्यानंतर आता कृषीच्या धर्तीवर सवलतीच्या दरात वीज पुरवठ्यासह, कर्जावरील व्याज सवलत देखील देण्यात येणार आहे. जिल्हा उपायुक्तांकडे पशुपालकांनी नोंदणी केल्यानंतर त्यांना वीज सवलत दरात मिळणार आहे. मात्र, त्यासाठी वीज वितरण स्वतंत्र मीटर बसवणार आहे.

ही सवलत पशुपालन प्रकल्पातील पशुगृह, चारा, पशुखाद्य, प्रक्रिया व शितगृहासाठी सवलतीच्या दरात वीज देण्यात येणार आहे. पशुपालन व्यवसाय स्वतंत्र व्यवसाय न मानता कृषी व्यवसायच समजण्यात येणार आहे. त्यासाठी पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे यांना शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यानुसार पशुपालनाला कृषी व्यवसायाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यानुसार आता पशुपालकांना विविध सवलती देण्यात येणार आहेत.

**या पशुपालकांना मिळणार सवलत**
- २५ हजार किंवा त्यापेक्षा कमी मांसल कुक्कुट पक्षी
- ५० हजार किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादन पक्षी
- ४५ हजार किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट
- १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ पशुधनाचा गोठा
- ५०० किंवा त्यापेक्षा कमी शेळ्या, मेंढ्यांचा गोठा
- २०० किंवा त्यापेक्षा कमी वराहपालन युनिट

> राज्यातील पशुपालकांसाठी सुवर्णसंधी आहे. या माध्यमातून पशुपालकांचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात कमी होऊन यांत्रिकीकरणावर भर देता येणार आहे.
> - **डॉ. विशाल येवले**, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय

---

लोकमत

लोकमत

# आता पशुपालकांना 'कृषी'च्या दराने वीज मिळणार; बिलात बचत होणार

लोकमत एक्सक्लुझिव्ह

लोकमत न्यूज नेटवर्क

बीड : राज्य सरकारने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता वीजदरात सवलतीचा लाभ देण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे. पशुपालकांना 'कृषी'प्रमाणे वीजदर सवलतीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या व राज्याच्या सकल उत्पादनात वाढ करण्याच्या अनुषंगाने पशुसंवर्धन व्यवसायांचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस निती आयोगाने केली होती. त्यानुसार पशुपालकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी राज्य शासनाने निर्णय घेतला. यामुळे पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होऊ शकेल.

### बिलात मोठी बचत होणार

कृषी वीजदराच्या तुलनेत जास्त वीजदर, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक व्याजदराची आकारणी आता पशुसंवर्धन व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा लागू केल्यामुळे होणार नसल्याने बिलात मोठी बचत होणार आहे. तसेच सौर ऊर्जेसाठी अनुदानाचा लाभ मिळू शकणार आहे.


### बीड जिल्ह्यातील पशुपालकांचे सर्वेक्षण

शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील पशुपालकांची तसेच त्यांच्याकडील सुविधांची माहिती संकलित करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते.



### वीजदर सवलतीची कार्यपद्धती निश्चित

कृषी समकक्ष दर्जाच्या अनुषंगाने सध्या अस्तित्वात असलेल्या वीजदर सवलतीस पात्र लाभार्थ्यांचा तपशील तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी महावितरणच्या उपअभियंत्यांकडे उपलब्ध करून देतील. त्यानुसार पुढील कार्यवाहीबाबत कार्यपद्धती निश्चित केली आहे.



### कुठे आणि कशी करायची नोंदणी?

वीजदरातील सवलतींचा लाभ मिळण्यासाठी पशुपालन प्रकल्पांनी पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय जिल्हा उपायुक्तांकडे नोंदणी करणे आवश्यक आहे.

### पशुपालकांनी लाभ घ्यावा

शासन निर्णयानुसार पशुपालन व्यवसायासाठी लागणाऱ्या वीजदराची आकारणी 'कृषी' या वर्गवारीनुसार होणार आहे. याचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त पशुपालकांनी आपल्या व्यवसायाची नोंदणी जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालयात करावी, असे आवाहन जिल्हा उपायुक्त आर. डी. कदम यांनी केले आहे.

### पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा

पशुजन्य उत्पादनात वाढ, व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरणामुळे पशुजन्य उत्पादीत बाबींना मूल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेतीप्रमाणे गटपद्धतीने पशुसंवर्धन अशा व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

### कोणत्या पशुपालकांना मिळणार लाभ?

कुक्कुटपालन, पशुपालन प्रकल्प व दुग्ध व्यवसायासाठी सोलार पंप व इतर सोलार संच उभारण्यास कृषी व्यवसायास देण्यात येणाऱ्या दराने सवलत मिळणार आहे.

### आता कृषीच्या वीजदराने मिळणार

पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून कृषीच्या दराने वीज उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



### पात्रता आणि निकष काय?

प्रकल्पातील सर्व पशुधनाची भारत पशुधन प्रणालीवर नोंदणी आवश्यक आहे.

**प्रकल्पासाठी स्वतंत्र वीज मीटर आवश्यक आहे. पशुधन संख्येची अट पूर्ण करणे आवश्यक आहे.**

लोकमत

# दुग्धविकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात अमरावतीचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

अमरावती : विदर्भ, मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्याचा श्रीगणेशा करण्यात आला आहे. यामध्ये अमरावती विभागाचाही समावेश आहे. दुग्ध उत्पादनामध्ये वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी हा प्रकल्प शासनाने सुरू केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पशुसंवर्धन विभागासह अन्य संबंधित यंत्रणाची संयुक्त बैठक घेऊन या प्रकल्पाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्य शासनाच्या वतीने शेतकऱ्यांचा आर्थिकस्तर उंचवावा यासाठी शेतीपूरक व्यवसायाची जोड देण्यावर भर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शेतकऱ्यांसाठी विदर्भ, मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. याकरिता अमरावती जिल्ह्याला दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झालेला आहे. या प्रकल्पांतर्गत ५० टक्के अनुदानावर उच्च दूध उत्पादन क्षमता असणाऱ्या दुधाळ गायी म्हशी वाटप, बाह्य तंत्रज्ञानाद्वारे आयव्हीएफ गाभण कालवडी ७५ टक्के अनुदानावर वाटप केले जाणार आहे. याशिवाय विद्युत चलीत कडबा कुटी यंत्र ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना वितरित केले जाणार आहे. पशुखाद्य २५ टक्के अनुदान, फॅट व एस.एन.एफ. वर्धक व १०० टक्के अनुदानावर उच्च प्रतीचे वैरण बियाणे आदी सर्व उपक्रम शेतकऱ्यांना लाभ घेण्यासाठी ऑनलाइन शासनाने दिलेल्या संकेतस्थळावर नोंदणी करावी लागणार आहे. या प्रकल्पाची प्रभावीअंमलबजावणी करण्याचे दृष्टीने जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पशुसंवर्धन विभाग, सहकार विभाग, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सदर प्रकल्पातील उपक्रमाचा लाभ शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचे दृष्टीने सूचना दिल्या आहेत.

**शासनाचा महत्त्वाकांक्षी उपक्रम : शेतकऱ्यांना मिळणार विविध सोयी-सवलतीचा लाभ**

बैठकीला डीडीआर शंकर कुंभार, कृषी उपसंचालक तरुण देशमुख, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी यादव, सहायक पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन. एम. अवघड, डॉ. एस. व्ही. महल्ले, डॉ. पी. व्ही. सोळंके, जिल्हा प्रकल्प अधिकारी डॉ. एम. जे. आडे व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. संजय कावरे उपस्थित होते.

### चाराटंचाईसाठीही उपाययोजना

विदर्भ, मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पांतर्गत उन्हाळ्यामध्ये चाराटंचाईसदृश परिस्थितीवर मात करण्यासाठी पशुपालकांना मुरघास निर्मिती करून मुरघासाचा वापर अधिक व्हावा, याकरिता प्रकल्पाद्वारे अनुदान दिले आहे.

### दूध संकलनास प्रारंभ, मार्केटिंगसाठी करार

प्रकल्पाच्या माध्यमातून दुधाचे उत्पादन वाढवून शेतकऱ्यांना दुधाकरिता बाजारपेठ उपलब्ध व्हावी, याकरिता मराठवाडा दूध उत्पादक कंपनीशी करार करण्यात आला. कंपनीमार्फत दूध संकलनास प्रारंभ झालेला आहे.

### पशुवंध्यत्व रोखणार

पशुवंध्यत्व हा पशुपालनात मोठा अड[थळा] आहेत. त्याबाबत निवारण शिबिरे घे[ऊन] पशुमधील वंध्यत्व दूर करून जनावरे दुधात आणणे व दूध उत्पादनाचे शास्त्रोक्त प्रशिक्षण या प्रकल्पात शेतकऱ्यांना दिले जाणार आहे.

> जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत वैर[ण] विकास कार्यक्रमांतर्गत १०० टक्के अनुदानावर वैरण बियाण्यासाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारला जात आहे. यासह वरील प्रकल्पातील योजनेचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा.
>
> **डॉ. संजय कावरे,** जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, अमरावती

पुढारी

# तुपारी येथे ५० मेंढ्यांना विषबाधा

## एक मेंढी दगावली

बोरगाव : पुढारी वृत्तसेवा

तुपारी (ता. पलूस) येथे कळपाने चारण्यासाठी आलेल्या मेंढ्यांनी विषारी वनस्पती खाल्याने सुमारे ५० मेंढ्यांना विषबाधा झाली. या मेंढ्यांवर ईश्वरपूर व पलूस येथील पशुसंवर्धन विभागाने तातडीने उपचार केले.

पैकी ४९ मेंढ्यांना वाचवण्यात यश आले, तर एक मेंढी मात्र दगावली. खटाव तालुक्यातील म्हसवड येथील विष्णू पोकळे हे मेंढ्यांचा कळप घेऊन चारण्यासाठी तुपारी येथे आले आहेत. गुरुवारी सायंकाळी या मेंढ्यांच्या कळपाने विषारी वनस्पती खाल्ली. यामुळे कळपातील जवळपास ५० मेंढ्यांना विषबाधा झाली. ईश्वरपूर येथील सहायक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. सचिन वंजारी पलूस व ईश्वरपूर येथील पथक घेऊन घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत एका मेंढीचा मृत्यू झाला होता, तर दोन मेंढ्या अस्वस्थ होत्या. त्यांच्यावर तातडीने जागेवरच उपचार करण्यात आले. डॉ. सचिन वंजारी, डॉ. संजय पवार, डॉ. अंबादास माडकर, डॉ. संतोष कनके, डॉ. मुसा मुल्ला, मन्सूर पीरजादे, ताकारी दवाखान्याचे प्रमुख अनिल बनसोडे, रोहित कुंभार, शंतनू खारगे, सचिन जाधव यांच्या पथकाने मेंढ्यांवर उपचार केले.

सकाळ अॅग्रोवन २

मंगळवार, १८ नोव्हेंबर २०२५

# राष्ट्रीय 'गोपाळ रत्न' पुरस्कारात महाराष्ट्र अव्वल

## कोल्हापूरचे पाटील देशात पहिले, निघोजच्या श्रद्धा ढवण तृतीय

अॅग्रोवन वृत्तसेवा

नवी दिल्ली : केंद्रीय पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कारामध्ये राज्यातील दोन पशुपालकांनी मोहोर उठविली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील नानीबाई चिखली (ता. कागल) येथील अरविंद यशवंत पाटील यांना देशातील सर्वोत्कृष्ट पशुपालक म्हणून पहिल्या क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांना ५ लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरवण्यात येणार आहे.

तृतीय पुरस्कारासाठी निघोज (ता. पारनेर) येथील श्रद्धा सत्यवान ढवण यांची निवड झाली आहे. दोन लाख रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. २६ नोव्हेंबरला दुग्धदिनानिमित्त नवी दिल्ली येथे केंद्रीय पशुसंवर्धन व दूध व्यवसायमंत्री राजीव रंजन सिंह, राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होणार आहे. सर्वोत्तम दूध उत्पादकांना पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागातर्फे पशुपालन व्यवसायात भरीव काम करणाऱ्या पशुपालकांना प्रतिष्ठेचा राष्ट्रीय गोपाळ रत्न पुरस्कार दिला जातो. यंदाच्या पुरस्कारासाठी देशभरातून २०८१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून देशभरातील पशुपालकांसाठी चार आणि हिमालय प्रदेशासाठी विशेष पाच ...



अरविंद पाटील



श्रद्धा ढवण

हैदराबाद (तेलंगणा) मधील डॉ. कंकणाला कृष्णा रेड्डी, यांना द्वितीय (५ लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र), निघोज (ता. पारनेर) येथील श्रद्धा सत्यवान ढवण (२ लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) आणि सीकर (राजस्थान) येथील हर्षित झुरिया यांना तृतीय (२ लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र) पुरस्कार जाहीर झाला आहे. याशिवाय हमीरपूर (हिमाचल प्रदेश) मधील विजय लता, चंपावत (उत्तराखंड) मधील प्रदीप पंगारिया यांच्यासह वायनाड (केरळ) येथील मीनन गदी शिरोला पडका, पलक्कड केरळा येथील कुजमकडुपथी, जयपूर (राजस्थान) येथील चिनोई दुग्ध उत्पादक समिती, आर्यालूर येथील सेंद्राई मिल्क प्रोड्युसर कंपनी, उत्तराखंड मधील कुल्हा दुड आदी संस्थांनाही पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे.

सर्वोत्कृष्ट कृत्रिम रेतन तंत्रज्ञ म्हणून अनुगुल (ओडिशा) मधील दिलीप कुमार प्रधान, ...

नंदयाल (आंध्रप्रदेश) श्रीमती अनुराधा चकली बारपेटा (आसाम) येथील देलुवार हसन यांचा गौरव ... आहे.

### जातिवंत पैदाशीवर भर

नानीबाई चिखली (ता. कागल) येथील श्री. पाटील यांच्या एकत्रित कुटुंबाचा एकशे पंचवीस जनावरांचा गोठा आहे. यामध्ये ७० मुऱ्हा म्हशी आणि चाळीस गीर गोवंश संगोपन त्यांनी केले आहे. प्रति दिन सहाशे लिटरपर्यंत दूध संकलन होते. दहा एकरांमध्ये विविध चारा पिकांची लागवड केलेली आहे. जातिवंत पैदाशीवर त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. मुक्त गोठा, दूध काढणी यंत्राचा वापर, मुरघास, सीरकॅनेचा त्यांनी चांगला वापर केला आहे. विविध उत्पादने ते तयार करतात. आजपर्यंत लाखो पशुपालकांना पाटील कुटुंबीयांनी प्रशिक्षित केले आहे. निघोज (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे श्रद्धा यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत दोन म्हशींपासून दुग्धव्यवसायाला सुरुवात केली. सध्या त्यांच्याकडे ६९ जातिवंत दुधाळ म्हशी आहे. दूध व्यवसायामध्ये त्यांनी स्वतःची ओळख तयार केली आहे.

सकाळ

# पावसानंतर आता थंडीच्या लाटेची शक्यता

## सतर्कतेचा इशारा; पशुधनाचा बचाव करण्याचे पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

सकाळ वृत्तसेवा

नवेखेड, ता. १५ : 'अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे सांगली जिल्ह्यात तापमान झपाट्याने कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार नोव्हेंबरच्या उत्तरार्धात थंडीची लाट जाणवू शकते. ही स्थिती विशेषतः ग्रामीण भागातील पशुधनासाठी धोकादायक ठरू शकते. तेव्हा, पशुपालकांनी जनावरांचा थंडीपासून बचाव करण्यासाठी उपाययोजना कराव्यात,' असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागाने केले.

सांगली जिल्ह्यात मेपासून पावसाला सुरुवात झाली. अतिवृष्टी, महापुरामुळे मोठे नुकसान झाले. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यातच आता थंडीच्या लाटेची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अजयनाथ थोरे यांनीही जनावरांची काळजी घेण्याचे आवाहन केले. थंडीमुळे जनावरांच्या शरीराचे तापमान कमी झाल्यास त्यांना धोका होऊ शकतो.

> थंडीत पशुपालकांनी पशूंची वरीलप्रमाणे काळजी घ्यावी. काही अडचण आल्यास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा.
>
> **- डॉ. अजयनाथ थोरे,** जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय

### हे करावे...

- निवारा चहूबाजूने आच्छादित करावा
- कडाक्याची थंडी असल्यास निवाऱ्यात कृत्रिम प्रकाश व उष्णता पुरवायची सोय करावी
- रात्री सर्व पशुधन ऊबदार निवाऱ्यात ठेवावे
- ओलसरपणा व धूर टाळावा
- लहान व अशक्त पशुधनास पेंड व गूळ देण्यात यावा. तसेच त्यांना ऊबदार जागी ठेवावे
- पशुधनासाठी उच्च दर्जाचा चारा व पशुखाद्याचा मुबलक साठा असावा

### काय करू नये..?

- थंडीत पशुधनास उघड्यावर बांधू नये, तसेच मोकाट सोडू नये
- थंडीमध्ये पशुमेळाव्यांचे आयोजन टाळावे
- पशुधनास पिण्यास थंड पाणी देऊ नये
- पशुधनाच्या निवाऱ्यात ओलसरपणा व धूर टाळावा
- रात्री व थंडीत पशुधनास उघड्यावर बांधून ठेवू नये
- मृत पशुधनाचे शव कचऱ्यावर अथवा चरावयाच्या मार्गात टाकू नये

जन-संग्राम

# वागद (इ.) येथे पशू चिकित्सा शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद; साथरोगांवर मोफत उपचार

जन-संग्राम



महागाव : महागाव तालुक्यातील वागद (इ) येथे काळी (दौ) पशुवैद्यकीय दवाखान्याच्या वतीने आयोजित पशुसंवर्धन जनजागृती अभियानाला शेतकऱ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. ... महत्त्वपूर्ण कृती शिबिर पार पडले. ... आणि पशुधनाला गंभीर संसर्गजन्य रोगांची साथ वेगाने पसरत आहे. खाजगी डॉक्टरांकडील औषधोपचार सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने पशुपालक हवालदिल झाले होते. या शिबिरामुळे त्यांना मोठा आधार मिळाला आहे.

बदलत्या हवामानाचा फटका आणि थंडीच्या लाटेमुळे जनावरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या शिबिरात केवळ औषधोपचार नव्हे, तर ... तपासणी आणि खच्चीकरण ... शस्त्रक्रियाही करण्यात आल्या. ... जनावरांचा आहार आणि निवाऱ्यात काय बदल करावेत याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे ... उपचारांचा पुरेसा खर्च वाचल्याने ... समाधान व्यक्त केले. या यशस्वी उपक्रमासाठी काळी (दौ) येथील संस्थाप्रमुख ... येथील संस्थाप्रमुख ... राठोड, ... अनिल ... आणि ... राठोड यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिराचा लाभ घेण्यासाठी पशुपालक ... राठोड, ... राठोड, गोविंद ... जाधव ... परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ... औषधोपचारांचा खर्च वाचल्याने पशुपालकांनी सुटकेचा निःश्वास सोडला असून, अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

सकाळ अॅग्रोवन ३

पुणे, शुक्रवार, २१ नोव्हेंबर २०२५



पुणे : पुणे कृषी महाविद्यालयातील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला विविध मान्यवर, अधिकारी व शास्त्रज्ञांनी भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली.

# देशी गोपालन मॉडेलची कृषी, पशुसंवर्धन सचिवांकडून पाहणी

अॅग्रोवन वृत्तसेवा

पुणे : पुणे कृषी महाविद्यालयात कृषी, पशुसंवर्धन यासह विविध विभागाचे अधिकारी आणि शास्त्रज्ञांनी येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राला भेट देऊन प्रकल्पाची मंगळवारी (ता. १८) पाहणी करून सखोल आढावा घेतला. येथे आयोजित एक दिवसीय नैसर्गिक शेती परिषदेनिमित्त ते आले होते.

या वेळी कृषी विभागाचे कृषी विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकासचंद्र रस्तोगी, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे 'पोकरा'चे संचालक परिमल सिंग, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, आनंद कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. कथारिया, सरदार कृषीनगर दांतीवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्रसिंग चौहान, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे यांनी प्रकल्पाच्या कार्यप्रणालीचे कौतुक केले.

प्रकल्पात विकसित केलेल्या भारतातील आदर्श व शाश्वत देशी गोपालन मॉडेलची पाहणी करताना त्यांनी केंद्राच्या सर्वांगीण कामाचे या वेळी त्यांनी कौतुक केले.

ही भेट नैसर्गिक शेतीसाठी देशी गाय-आधारित संशोधनाचे वाढते महत्त्व अधोरेखित करणारी ठरली. आजच्या कृषी व्यवस्थेत मातीचे आरोग्य, उत्पादन खर्च, रासायनिक अवलंबित्व आणि पर्यावरणीय संतुलन ही प्रमुख आव्हाने आहेत; त्यांवर मात करण्यासाठी देशी गाय हा केंद्रबिंदू ठरत आहे. देशी गायीचे शेण-गोमूत्र हे नैसर्गिक शेतीतील मूलभूत घटक असून त्यातून तयार होणारे जीवामृत, घनजीवामृत, बीजामृत, गांडूळखत या सारखी सेंद्रिय खते शेतीला स्वयंपूर्ण, रसायन अवशेष मुक्त आणि शाश्वत बनवतात. प्रकल्पाची संपूर्ण माहिती केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी दिली.

पुण्य नगरी

# निघोजच्या श्रद्धा ढवण यांना 'राष्ट्रीय गोपाळरत्न पुरस्कार' जाहीर

**केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्र्यांच्या हस्ते २६ नोव्हेंबर रोजी पुरस्काराचे वितरण**

अहिल्यानगर : केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'राष्ट्रीय गोपाल रत्न-२०२५' पुरस्कार जाहीर झाला असून राज्यातील दोन पशुपालकांपैकी अहिल्यानगर जिल्ह्यातील निघोज (ता. पारनेर) येथील श्रद्धा ढवण यांची राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांकासाठी निवड झाली. देशी गाई-म्हशींच्या संगोपनातून उत्कृष्ट दुग्ध उत्पादन व व्यवस्थापन केल्याबद्दल हा मानाचा सन्मान त्यांना मिळत आहे.



या पुरस्काराचे वितरण २६ नोव्हेंबर रोजी दुग्ध दिनानिमित्त केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह तसेच राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांच्या हस्ते होणार आहे.

श्रद्धा ढवण यांच्या यशाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी त्यांचा गौरव करून अभिनंदन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त डॉ. संतोष पालवे, डॉ. दशरथ दिघे, डॉ. मुकुंद राजळे, डॉ. सोपान नरे यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

देशभरात दूध भेसळीवरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर, 'जे दुध मी खाऊ शकेन तेच ग्राहकांना देईन' हा निर्धार बाळगत त्या स्वच्छ व आरोग्यदायी दुग्धनिर्मिती करत असल्याचेही श्रद्धा ढवण यांनी सांगितले.

जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक व्यवस्थापन, अल्प प्रतिजैविक व प्रतिजैविकांचा वापर, पशुधनासाठी अनुकूल वातावरण ठेवणे या तत्त्वांचा अवलंब केला असून दूध थेट विक्री केंद्राद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाते. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामस्वामी, आयुक्त प्रवीणकुमार देवरे आणि प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त पी. आर. नरवाडे यांनी श्रद्धा ढवण यांचे अभिनंदन केले आहे.

### स्वच्छ दूध निर्मितीचा हेतू जपत व्यवसायात बहुविधता

वडिलोपार्जित दुग्ध व्यवसायास आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धन व दुग्ध प्रक्रिया उपक्रमांची सांगड घातल्याने व्यवसाय अधिक शाश्वत व फायदेशीर झाला. दोन म्हशींपासून सुरुवात करून आज त्या ६९ म्हशींचे संगोपन करत आहेत. 'स्वच्छ दूध निर्मिती' हा हेतू जपत त्यांनी कार्बनेस निर्मिती व दुग्धजन्य पदार्थ उत्पादनाद्वारे व्यवसायाला बहुविधता दिली आहे, अशी प्रतिक्रिया श्रद्धा ढवण यांनी दिली.

विकास गाढवे

मातोळा (जि. लातूर) येथील प्रशांत भोसले यांनी तेरा वर्षांपूर्वी भाकड गाय घेतली. घरच्या दोन म्हशींसोबत तिचे काटेकोर संगोपन केले. त्यातूनच किफायतशीर दुग्ध व्यवसायाचा मंत्र मिळाला. एकत्रित कुटुंब पद्धतीची जपणूक, दर्जेदार दूध उत्पादन, पैदास, शेणखत, जमिनीची सुपीकता अशी सूत्री जपली. आज सुमारे ५० गाईंचे गोकूळ तयार केले आहे. दररोज रात्री शांत, समाधानाची झोप लागते असे म्हणणाऱ्या प्रशांत यांनी पीक उत्पादन आणि दुग्धव्यवसाय मिळून वैभव तयार केले आहे.





# वैभवच नव्हे, रोजची शांत झोप मिळवली

## शेतीसह दुग्धव्यवसायात भोसले कुटुंबाची प्रगती

### गोठा व्यवस्थापन- ठळक बाबी

### शेणखतामुळे शेती सुधारली

### शेतीला मिळाले वैभव

### वृक्ष लागवडीत योगदान

### प्रसन्नता सर्वात महत्त्वाची





पुण्य नगरी

# एकाच दिवशी १८ पशुवैद्यकीय शिबिरांचे यशस्वी आयोजन

**वाई पंचायत समितीचा अभिनव उपक्रम**

**वाई/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान २०२५ अंतर्गत वाई तालुक्यात पशुपालकांसाठी एक महत्त्वपूर्ण आणि अभिनव पक्रम राबवण्यात आला आहे. वाई पंचायत समितीच्या पुढाकाराने एकाच दिवशी १८ पशुवैद्यकीय शिबिरे आणि चर्चासत्रांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

या उपक्रमामुळे तालुक्यातील ६१६ पशुपालकांना थेट लाभ मिळाला आहे. मंत्री मकरंद पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारण्यात आला. सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. दिनकर वोर्ड आणि गट विकास अधिकारी



पशुवैद्यकीय शिबिराप्रसंगी उपस्थित मान्यवर

विजयकुमार परीट यांच्या नेतृत्वाखाली हे शिबिर पार पडले. वाई तालुक्यातील १५ पशुवैद्यकीय संस्थांच्या माध्यमातून पशुधन कार्यमोहीम शिबिर व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. उर्वरित ३ संस्थांमध्ये दि. २१ रोजी शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे.या शिबिरात पशुधनासाठी विविध आरोग्य सेवा पुरवण्यात आल्या. यामध्ये १२ कृत्रिम रेतन, ३९ गर्भधारणा तपासणी, ८६ वांझ तपासणी, २३० औषधोपचार, ३२७० जंत निर्मुलन आणि ४५० गोचिड निर्मुलन करण्यात आले. तसेच शिबिरादरम्यान पशुपालकांना पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली, तसेच पशुसंगोपनाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिराचा लाभ वाई तालुक्यातील ६१६ इतक्या पशुपालकांनी घेतला. शिबिर यशस्वी करण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील पशुपालकांनी उस्फुर्त प्रतिसाद नोंदवला, ज्यामुळे हा उपक्रम तालुक्यासाठी एक आदर्श ठरला आहे.पशुपालकांसाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरला असून, यामुळे पशुधनाचे आरोग्य सुधारण्यास आणि पशुपालकांचे उत्पन्न वाढण्यास निश्चितच मदत होईल.

पुण्य नगरी

पुणे ग्रामीण

। पुण । बुधवार, २६ नोव्हेंबर २०२५

# पुणे जिल्ह्यात पशुसंवर्धन क्षेत्राला मोठी चालना

**१६ नवीन पशुवैद्यकीय दवाखान्यांना मंजुरी** — २८ दवाखान्यांची दुरुस्ती; जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांची माहिती

**। पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पशुसंवर्धन सेवांचा दर्जा आणखी उंचावण्यासाठी महत्त्वाचा निर्णय पुणे जिल्हा परिषदेकडून घेण्यात आला आहे. पुणे जिल्हा परिषदेकडून १६ नवीन पशुवैद्यकीय दवाखाने उभारण्यास मंजुरी देण्यात आली असून, विद्यमान २८ दवाखान्यांची दुरुस्ती व उन्नतीकरण करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे.

ग्रामीण भागात पशुधन हे शेतकऱ्यांच्या आर्थिक कणा मानले जाते. त्यामुळे आधुनिक सुविधा, तात्काळ उपचार आणि प्रयोगशाळीय सुविधांचा लवकर व दर्जेदार लाभ उपलब्ध व्हावा, या हेतूने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितले. नवीन दवाखान्यांमध्ये आधुनिक एक्स-रे मशीन, ब्लड एनालायझर, तपासणीसाठी लागणारी अत्यावश्यक उपकरणे, उपचार साहित्य अशा सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हे दवाखाने 'मॉडेल पशुवैद्यकीय दवाखाने' म्हणून विकसित केले जातील. पशुपालकांना वैज्ञानिक पद्धतीने सेवा देणे आणि उपचार प्रक्रियेला गती देणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. नवीन दवाखान्यांची उभारणी आंबेगाव मधील वळती, खेड मधील ढेहने, इंदापूर तालुक्यातील बावडा, लाकडी, पिंपरी बुद्रुक, निमगाव केतकी आणि संसार, तसेच बारामती तालुक्यातील मूर्ती, खांडज आणि सोनगाव येथे करण्यात येणार आहे. या दहा ठिकाणांची निवड भूगोल, पशुधनाची संख्या आणि गावांच्या गरजांच्या अधारे करण्यात आली आहे. याशिवाय रांजणगाव, केडगाव, वेल्हा आणि पुरंदर येथील विद्यमान पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये एक्स-रे मशीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे जखमी जनावरांच्या निदान प्रक्रियेला अधिक अचूकता आणि वेग येणार आहे. या निर्णयामुळे पशुपालकांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळणार असून उपचार सेवा गावपातळीवर अधिक प्रभावी आणि सुकर होणार आहेत. पशुधनाच्या आरोग्यासाठीचा हा सर्वसमावेशक उपक्रम जिल्ह्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेला निश्चितच बळकटी देणारा ठरणार आहे.


पुढारी

# कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण तत्काळ करा

## जिल्हाधिकारी अशोक काकडे ; प्राणीक्लेष प्रतिबंधक समितीची बैठक

**सांगली : पुढारी वृत्तसेवा**

भटक्या, मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण तत्काळ सुरू करण्यात यावे, ... सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे अनुपालन करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी सोमवारी येथे दिल्या.



सांगली : प्राणीक्लेष प्रतिबंधक समितीच्या बैठकीत अशोक काकडे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विशाल नरवाडे, डॉ. अजयनाथ थोरे आदी उपस्थित होते.

Sangli Edition
Nov 25, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

शब्दांना सत्याची धार
RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED
प्रहार

# श्रद्धा ढवणला राष्ट्रीय गोपाळ रत्न - २०२५ पुरस्कार जाहीर

◆ अहिल्यानगर (प्रतिनिधी) :


केंद्र शासनाच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागातर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा "राष्ट्रीय गोपाळ रत्न-२०२५" पुरस्कार जाहीर झाला असून राज्यातील दोन पशुपालकांपैकी अहिल्यानगर जिल्ह्यातील निघोज (ता. पारनेर) येथील श्रद्धा ढवण यांची राष्ट्रीय स्तरावर तृतीय क्रमांकासाठी निवड झाली आहे. देशी गाई-म्हशींच्या संगोपनातून उत्कृष्ट दुग्ध उत्पादन व व्यवस्थापन केल्याबद्दल हा मानाचा सन्मान त्यांना मिळत आहे.

या पुरस्काराचे वितरण २६ नोव्हेंबर रोजी दुग्ध दिनानिमित्त केंद्रीय पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह तसेच राज्यमंत्री एम. पी. सिंह बघेल यांच्या हस्ते होणार आहे.श्रद्धा ढवण यांच्या यशाबद्दल जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया (भाप्रसे) यांनी त्यांचा गौरव करून अभिनंदन केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी (भाप्रसे), जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. उमेश पाटील, सहाय्यक आयुक्त डॉ. संतोष पालवे, डॉ. दशरथ दिघे, डॉ. मुकुंद राजळे, डॉ. सोपान नांदे यांसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.वडिलोपार्जित दुग्ध व्यवसायास आधुनिक तंत्रज्ञान, मूल्यवर्धन



व दुग्ध प्रक्रिया उपक्रमांची सांगड घातल्याने व्यवसाय अधिक शाश्वत व फायदेशीर झाला. दोन म्हशींपासून सुरुवात करून आज त्या ६९ म्हशींचे संगोपन करत आहोत. "स्वच्छ दूध निर्मिती" हा हेतु जपत त्यांनी बायोगॅस निर्मिती व दुग्धजन्य पदार्थ उत्पादनाद्वारे व्यवसायाला बहुविधता दिली आहे, अशी प्रतिक्रिया श्रद्धा ढवण यांनी दिली.देशभरात दूध भेसळीवरील चर्चेच्या पार्श्वभूमीवर, "जे दूध मी खाऊ शकेन तेच ग्राहकांना देईन" हा निर्धार बाळगत त्या स्वच्छ व आरोग्यदायी दुधनिर्मिती करत असल्याचेही त्यांनी सांगितले.जिल्हा पशुसंवर्धन विभागाच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक व्यवस्थापन, अल्प संप्रेरक व प्रतिजैवकांचा वापर, पशुधनासाठी अनुकूल वातावरण ठेवणे या तत्वांचा अवलंब केला असून दूध थेट विक्री केंद्रांद्वारे ग्राहकांपर्यंत पोहोचवले जाते.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. रामस्वामी, आयुक्त प्रवीणकुमार देवरे आणि प्रादेशिक पशुसंवर्धन सहायुक्त बी. आर. नरबाडे यांनी श्रद्धा ढवण यांचे अभिनंदन केले आहे.




# पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणातून पशुसंवर्धन क्षेत्राच्या विकासासाठी विभागाने आरंभलेले प्रयत्न (AHIDF)

केंद्र सरकार देशातील पशुपालन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी आधुनिक आणि प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. पशुपालकांचे उत्पन्न दुप्पट करणे, दूध उत्पादन वाढवणे आणि देशातील दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता आणि प्रमाण लक्षणीयरीत्या वाढवणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. यासाठी, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय विभाग पशुपालन पायाभूत सुविधा विकास निधी (AHIDF) अंतर्गत अनेक नवीन तंत्रज्ञानांना प्रोत्साहन देत आहे. या उच्च तंत्रज्ञानामध्ये स्वयंचलित दुग्धव्यवसाय आणि मांस प्रक्रिया युनिट्स, सेन्सर-आधारित खाद्य आणि पाणी व्यवस्थापन प्रणाली, पर्यावरण नियंत्रित पोल्ट्री फार्म, लसीकरण तंत्रज्ञान आणि प्राण्यांच्या कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी जैवपचन आणि सेंद्रिय खत उत्पादन तंत्रांचा समावेश आहे. या उपाययोजनांचा उद्देश देशातील ८ कोटी लहान आणि मोठ्या पशुपालकांना वैज्ञानिक पशुपालन सुविधा प्रदान करणे आहे.



मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,
पुणे-६७

**वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानामुळे वाढेल मादी वासरांची संख्या**

केंद्र सरकार दूध उत्पादन वाढवण्यासाठी आणि दुग्धजन्य जातींची संख्या वाढवण्यासाठी लिंग-वर्गीकृत वीर्य तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहे. ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑक्टोबर २०२४ मध्ये सुरू केली होती. या तंत्रामुळे ८५-९०% प्रकरणांमध्ये मादी वासरू निर्माण होण्याची क्षमता आहे, ज्यामुळे भविष्यात जास्त उत्पादन देणाऱ्या गायींची संख्या वाढेल. ही सेवा पाच सरकारी वीर्य केंद्रांवर दिली जात आहे. खाजगी केंद्रांवर उत्पादित वीर्य डोस देखील या एकूण संख्येत समाविष्ट आहेत. पशुधन शेतकऱ्यांना ५०% पर्यंत अनुदान मिळते. हे तंत्रज्ञान स्वदेशी आणि परवडणारे असावे यासाठी डिझाइन केले आहे जेणेकरून ते ग्रामीण भागात सहज उपलब्ध होईल.

**आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे देशी जातींमध्ये सुधारणा:**

देशात प्रथमच, राष्ट्रीय गोकुळ अभियानांतर्गत गोवंश आयव्हीएफ तंत्रज्ञान सुरू करण्यात आले आहे. हे देशी जातींच्या संवर्धन आणि सुधारणात मोठी मदत करत आहे. देशभरात २३ गोवंश आयव्हीएफ प्रयोगशाळा कार्यरत आहेत.




आतापर्यंत २६,९८७ भ्रूण तयार केले गेले आहेत आणि १४,९९३ भ्रूण गायींना हस्तांतरित केले गेले आहेत. यामुळे २,३६१ वासरे जन्माला आली आहेत. यशस्वी आयव्हीएफ केससाठी पशुपालकांना ५,००० रुपयांचे प्रोत्साहन दिले जाते. हे तंत्रज्ञान आता प्रत्येक गावात नेले जात आहे. सप्टेंबर २०२४ मध्ये, एनडीडीबी (राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ) आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे आयव्हीएफ तंत्रज्ञान सुरू केले. यामुळे स्थानिक जातींचे जतन करण्यास आणि परदेशी जातींवरील अवलंबित्व कमी करण्यास मोठी मदत होत आहे.

**स्टार्टअप्सनाही मिळते आहे प्रोत्साहन**

पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रात नवोपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी, सरकार स्टार्टअप्सना विशेष पाठिंबा देत आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये हैदराबाद येथे एक राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती, ज्यामुळे पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि पशुधनाशी संबंधित नवीन स्टार्टअप्सना त्यांचे विचार आणि प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली. यामुळे या क्षेत्रात तांत्रिक नवोपक्रमांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. पशुधन आणि दुग्धजन्य पदार्थांची वाढती मागणी लक्षात घेता, केंद्र सरकार प्रगत तंत्रज्ञान आणि योजनांद्वारे या क्षेत्राचे नूतनीकरण करण्याचे काम करत आहे. या प्रयत्नांमुळे केवळ दूध उत्पादन वाढणार नाही तर पशुपालकांचे उत्पन्नही वाढेल. याशिवाय, गावांची अर्थव्यवस्था मजबूत होईल आणि सेंद्रिय आणि दर्जेदार दुग्धजन्य पदार्थांच्या उत्पादनालाही चालना मिळेल.

**योजनेचे स्वरूप:** पशुसंवर्धन पायाभूत सुविधा विकास (AHIDF) अंतर्गत खालील सुविधा स्थापन करण्यासाठी **वैयक्तिक उद्योजक, खाजगी कंपन्या, MSME, शेतकरी उत्पादक संस्था (FPOs) आणि कलम ८ (Section ८) कंपन्यांद्वारे केलेल्या गुंतवणुकीस प्रोत्साहन (Incentivize) दिले जाते:**

(i) दुग्ध प्रक्रिया आणि मूल्यवर्धन पायाभूत सुविधा (Dairy processing and value addition infrastructure)

(ii) मांस प्रक्रिया आणि मूल्यवर्धन पायाभूत सुविधा (Meat processing and value addition infrastructure)

(iii) पशुखाद्य कारखाना (Animal Feed Plant)

**यश (Achievement)**

•**मंजूर अर्ज:** मंजूर अर्जामध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे.

- ❑ मंजूर अर्ज संख्या: १४१
- ❑ मंजूर रकमेचे मूल्य: रु. ३१७२.४० कोटी
- ❑ वितरित केलेली रक्कम (Disbursed amount): रु. ८७१.२ कोटी

•**व्याज अनुदान** (Interest Subvention):

- ❖ मंजूर केलेली रक्कम: रु. १०३.३ कोटी
- ❖ वितरीत केलेली रक्कम: रु. ६४ कोटी

• **रोजगार निर्मिती:** राज्यात AHIDF च्या मदतीने आतापर्यंत ११,६१४ रोजगार निर्माण झाले आहेत.

# पशुधन आरोग्य व रोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत, पशु औषधी विक्री केंद्र



पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण कार्यक्रम (LHDCP- Livestock Health and Disease Control Program) हा देशाच्या केंद्रिय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे; जो देशातील मोठ्या पशुधनसंख्येच्या आरोग्याचे रक्षण करण्यावर लक्ष केंद्रित करतो. जगातील सर्वात मोठ्या पशुधन संख्येपैकी एक असलेल्या या देशात, पशुंचे आरोग्य राखणे केवळ प्राण्यांच्या कल्याणासाठीच नाही तर भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी, अन्न सुरक्षा आणि लाखो पशुपालकांच्या उपजीविकेसाठी देखील महत्त्वाचे आहे. हा कार्यक्रम रोग प्रतिबंधक, नियंत्रण आणि व्यवस्थापनावर भर देतो, ज्यामुळे पशुपालन क्षेत्राची उत्पादकता आणि कार्यक्षमतेत लक्षणीय योगदान मिळते.



**डॉ. देवेंद्र सुरेश जाधव**
सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
(पशुधन व नियोजन) पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७



महापशुधन वार्ता

### पशुऔषधी विक्री केंद्र उपक्रमाची व्याप्ती व उद्देश:

देशाच्या अनेक भागात जेनेरिक पशुवैद्यकीय औषधे वापरण्यासाठी सहज उपलब्ध नाहीत. म्हणूनच पीएम-केएसके व सहकारी संस्थांद्वारे जेनेरिक पशुवैद्यकीय औषधे उपलब्ध करून देण्यासाठी 'पशु औषधी विक्री केंद्रे' स्थापन करण्याचा उपक्रम प्रस्तावित आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना जेनेरिक पशुवैद्यकीय औषधे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होतील.

भारत सरकारच्या मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्रालयाच्या अंतर्गत पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभाग (DAHD) द्वारे राबविण्यात येणारी, LHDCP ही एक केंद्र प्रायोजित योजना (CSS) आहे. या योजनेचा उद्देश लसीकरण, वाढीव पशुवैद्यकीय सेवा, सुधारित रोग देखरेख आणि चांगल्या पशुवैद्यकीय पायाभूत सुविधांद्वारे प्राण्यांच्या आरोग्यास होणारे धोके कमी करणे आहे. या कार्यक्रमाच्या प्रमुख उपक्रमांमध्ये पाय आणि तोंडाचे आजार (FMD), ब्रुसेलोसिस, पेस्टे डेस पेटिट्स रुमिनंट्स (PPR) आणि क्लासिकल स्वाइन फिव्हर (CSF) सारख्या आजारांविरुद्ध लसीकरण, शेतकऱ्यांच्या दाराशी शेवटच्या टप्प्यातील पशुवैद्यकीय सेवा पोहोचवण्यासाठी MVUs चे कार्यान्वित करणे, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या, विदेशी आणि झुनोटिक रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यांना मदत करणे आणि ईथनो-पशुवैद्यकीय औषधांसह जेनेरिक पशुवैद्यकीय औषधांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी PM किसान समृद्धी (PM-KSKs) आणि सहकारी संस्थांद्वारे पशुऔषधी विक्री केंद्रांची स्थापना करणे समाविष्ट आहे.

### मंत्रालये/संघटना/संस्था यांचे सहकार्य:

हा उपक्रम सहकार मंत्रालय व भारतीय औषधनिर्माण आणि वैद्यकीय उपकरण ब्युरो (PMBI) च्या औषधनिर्माण विभाग (DoP) यांच्या सहकार्याने हाती घेतला जाईल. भारतीय औषधनिर्माण व वैद्यकीय उपकरण ब्युरो (PMBI) च्या विद्यमान रचना आणि यंत्रणेद्वारे जेनेरिक पशुवैद्यकीय औषधांच्या खरेदी, गुणवत्ता चाचणी व साठा व्यवस्थापनात PMBI मदत करेल. तर पशुऔषधी विक्री केंद्रे उघडण्यासाठी PM-KSK व सहकारी संस्थांची ओळख च निवड करण्यात सहकार मंत्रालय मदत करेल. एलएचडीसीपीच्या पशुऔषधी घटकाच्या अंमलबजावणीत स्थानिक स्वराज्य संस्थांचा यथोचित सहभाग असेल.

### पशुऔषधी विक्री केंद्र उघडण्यासाठी पात्रता निकष:

पशुऔषधी विक्री केंद्रे उघडण्यासाठी पीएम-केएसके आणि सहकारी संस्था पात्र असतील. पशुऔषधी विक्री केंद्रासाठी अर्ज करणाऱ्या कोणत्याही पीएम-केएसके/सहकारी संस्थेला बी. फार्मा / डी. फार्मा पदवीधारकांना नियुक्त करावे लागेल आणि अर्ज सादर करताना किंवा अंतिम मंजुरीच्या वेळी त्याचा पुरावा सादर करावा लागेल.

### पशुऔषधी विक्री केंद्र उघडण्यासाठी आवश्यक बाबी / घटक:

i. किमान १२० चौरस फूट स्वमालकीची किंवा भाड्याने घेतलेली जागा, योग्य भाडेपट्टा करार किंवा जागा वाटप पत्राद्वारे मंजूर. अर्जदार (मान्यताप्राप्त पीएम-केएसके/सीएस) पशुऔषधी विक्री केंद्र चालविण्यासाठी जागेची व्यवस्था करेल आणि जागा व्यवस्था करण्यात डीएएचडीची कोणतीही भूमिका राहणार नाही.

ii. नाव, नोंदणी तपशीलांसह फार्मासिस्ट असल्याचा पुरावा.

iii. राज्य औषध नियंत्रण प्राधिकरणाकडून औषध विक्री परवाना. अंतिम मंजुरीच्या वेळीही हे सादर करता येईल.

iv. जर अर्जदार पीएम-केएसके किंवा सीएस हे आकांक्षी जिल्ह्यांमध्ये (मागास जिल्हा) किंवा नीती आयोगाने अधिसूचित केलेल्या आकांक्षी ब्लॉक्समध्ये, हिमालयीन, बेट प्रदेश आणि ईशान्य स्थित राज्यांमध्ये असतील, तर अर्जदाराने अर्जाच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांकडून योग्य प्रमाणपत्र/पुरावा सादर करावा लागेल. अर्जदाराने अर्जात योग्य लाभ मिळविण्यासाठी श्रेणी आणि श्रेणी नमूद करणे आवश्यक आहे. अर्जदाराने श्रेणी निवडल्यानंतर, नंतर अर्जदार कोणत्याही कारणास्तव भविष्यात ती बदलू शकणार नाही.

v. पशुऔषधी विक्री केंद्र उघडू इच्छिणाऱ्या अर्जदारांना DAHD च्या ऑनलाइन अर्ज पोर्टलद्वारे अर्ज करावा लागेल जो DAHD अंतर्गत NIC विभागाद्वारे तयार केला जाईल.

Vi. अर्जासोबत ५,०००/- रुपये (परत न करण्यायोग्य) अर्ज शुल्क जमा करावे लागेल. जर आयडी अर्जदार पीएम-केएसके/सीएस हा हिमालयीन, बेट प्रदेश आणि ईशान्य राज्यांमधील आकांक्षीत जिल्ह्यांमध्ये (मागास जिल्हा) किंवा नीती आयोगाने अधिसूचित केलेल्या आकांक्षीत ब्लॉकमध्ये स्थित असेल तर अर्ज शुल्क लागू होणार नाही. शुल्कातून सूट मिळविण्यासाठी अर्जदाराला त्यांच्या श्रेणीचा पुरावा सादर करावा लागेल.

**मंजुरी प्रक्रिया:**

i. फक्त ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातील.

ii. राज्य AHD (माध्यमातून) संबंधित संचालक फील्ड पडताळणी करतील

iii DAHD, SAHD, PMBI/DoP, MoC आणि MoPR द्वारे प्रतिनिधित्व केलेल्या समितीद्वारे अर्जाची तपासणी केली जाईल.

iv. स्क्रीनिंगनंतर DAHD कडून प्रारंभिक मान्यता तसेच अंतिम मान्यता दिली जाईल

v. अर्जदाराने 'अंतिम मंजुरी' मिळविण्यासाठी 'प्रारंभिक मान्यता' मिळाल्यापासून ९० दिवसांच्या आत पोर्टलद्वारे राज्य औषध नियंत्रण प्राधिकरणाकडून औषध विक्री परवाना यासह सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करावीत.

vi. 'अंतिम मंजुरी' मिळाल्यानंतर, अर्जदाराची माहिती स्टोअर कोड वाटप करण्यासाठी आणि 'POS' बसवण्यासाठी PMBI सोबत शेअर केली जाईल.

**मार्जिन व इन्सेन्टीव्ह**

**१. ऑपरेटिंग मार्जिन:** विक्री केंद्र ऑपरेटिंग एजन्सीला प्रत्येक औषधाच्या एमआरपीवर (कर वगळून) २०% मार्जिन दिले जाईल.

ii. **विशेष प्रोत्साहन:** नीती आयोगाने अधिसूचित केलेल्या आकांक्षी जिल्ह्यांमध्ये (मागास जिल्हा) किंवा आकांक्षी ब्लॉक्समध्ये आणि हिमालयीन, बेट प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये उघडलेल्या पशुऔषधी विक्रय केंद्रांना १.५० लाख रुपयांचे एक वेळचे विशेष प्रोत्साहन दिले जाईल.

हे विशेष प्रोत्साहन मूळ बिले सादर करून आणि प्रत्यक्ष खर्चापर्यंत मर्यादित ठेवून नवीन पशुऔषधी विक्री केंद्र उघडण्यासाठी एक-वेळ आर्थिक सहाय्य म्हणून प्रदान केले जाईल.

iii. **सामान्य प्रोत्साहन:** पशु औषधी विक्री केंद्राला २०% दराने (१०% खरेदीवर आधारित आणि १०% स्टॉकवर आधारित) प्रोत्साहन दिले जाईल. केंद्राने एका महिन्यात केलेल्या खरेदीवर आधारित १०% वितरित केले जाईल आणि उर्वरित १०% स्टॉकिंग मँडेटच्या आधारावर किंवा केंद्राने महिन्याभरात आवश्यक प्रमाणात औषधांचा पुरेसा साठा राखला असेल तर दिले जाईल. हे सामान्य प्रोत्साहन सर्व पशु औषधी विक्री केंद्राला लागू असेल. प्रोत्साहनाची गणना खालीलप्रमाणे केली जाईल:

**अ.** खरेदीच्या आधारावर १०% प्रोत्साहन (कमाल रु. १०,०००/- पर्यंत) केंद्राने केलेल्या मासिक खरेदीच्या आधारावर पीओएस सिस्टमद्वारे स्वयंचलितपणे मोजले जाईल.

**ब.** पीएमबीआयने राखलेल्या उत्पादन श्रेणीच्या आधारे गणना केल्यानुसार, स्टॉक मँडेटवर आधारित उर्वरित १०% प्रोत्साहन (कमाल रु. १०,०००/ पर्यंत).

**अंतर धोरण:**

- एका महसूल विभागात एकापेक्षा जास्त विक्री केंद्रे स्थापन केली जाणार नाहीत.
- जास्त पशुधन असलेल्या क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल (अलीकडील पशुगणनेच्या आकडेवारीनुसार मूल्यांकन केले जाईल).
- राज्य सरकार कराराच्या आधारावर विद्यमान पशु रुग्णालय इमारती / कॅम्पसमध्ये पीएम-केएसके / सीएसना केंद्रे उघडण्यासाठी जागा देऊ शकते. पशुवैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय परिसरासह सरकारी रुग्णालय परिसरात प्रस्तावित केंद्रांना प्राधान्य दिले जाईल.



**स्टॉकिंग आदेश:** साठवणुकीचा आदेश DAHD ने वेळोवेळी मंजूर केलेल्या औषधांच्या यादीच्या प्रमाणात असेल. मासिक प्रोत्साहन भत्ता स्टॉकिंग आदेशाशी जोडला जाईल तो खालीलप्रमाणे आहे:

| अ.क्र. | एकूण निर्धारित जेनेरिक औषधांच्या यादीची उत्पादन श्रेणी | पेमेंट टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ८० ते १००% | १००% पेमेंट |
| २ | ६५ ते ७९% | ७५% पेमेंट |
| ३ | ५१ ते ६४% | ५०% पेमेंट |
| ४ | ५०% पेक्षा कमी | पेमेंट नाही |

### ५. पशुऔषधी विक्री केंद्र चालविण्याच्या अटी व शर्ती:

**पशुऔषधी विक्री केंद्र चालवण्याच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:**

i. केंद्र उघडण्यासाठी प्रारंभिक मंजुरी मिळाल्यानंतर, पीएम-केएसके/सीएस डीएएचडी आणि / किंवा पीएमबीआय सोबत करार करेल. पशुऔषधी विक्री केंद्राचे सर्व कामकाज सदर कराराच्या अटी आणि शर्तींनुसार केले जाईल.

ii. "पशु औषधी विक्री केंद्र" या नावाने औषध परवाना (किंवा औषध दुकान चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर कोणत्याही वैधानिक परवानग्या) मिळवणे ही पीएम-केएसके / सीएसची जबाबदारी असेल. औषधांच्या साठवणुकीसाठी सर्व वैधानिक आवश्यकतांचे पालन पीएम-केएसके/सीएस द्वारे सुनिश्चित केले जाईल.

iii. पीएम-केएसके/सीएस केवळ ज्या कारणासाठी जागा वाटप करण्यात आली आहे; त्याच कारणासाठी वापरेल. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कोणालाही जागा भाड्याने देणार नाही.

iv. सर्व बिलिंग PoS सिस्टम सॉफ्टवेअर वापरून करावेत. पशुऔषधी विक्री केंद्रात PoS सिस्टम वापरल्याशिवाय कोणतेही पशुवैद्यकीय औषध विकता येणार नाही. केंद्राला पशुवैद्यकीय औषधे, संबंधित पशुवैद्यकीय उत्पादने, प्रमाणित पशुखाद्य इत्यादी विकण्याची परवानगी दिली जाऊ शकते.

vi. वस्तूंच्या पाठवणीसाठी आगाऊ देयक देऊन पीएमबीआयकडून वस्तूंचा पुरवठा केला जाईल.

vii. पीएमबीआयने पुरवलेल्या औषधांव्यतिरिक्त केंद्रात कोणतेही औषध विकण्याची परवानगी दिली जाणार नाही.

**सहकार मंत्रालयाची भूमिका:**

सहकार मंत्रालय पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाला योग्य पीएम-केएसके आणि सहकारी संस्थांची ओळख पटविण्यासाठी मदत करेल, पशुऔषधी विक्री केंद्रे उघडण्यासाठी योग्य अधिकाऱ्यांशी समन्वय साधेल.

### सहयोगी मंत्रालये / संघटनांची भूमिका

**फार्मास्युटिकल अँड मेडिकल डिव्हाइसेस ब्युरो ऑफ इंडिया (पीएमबीआय) ची भूमिका:**

रसायन व खते मंत्रालयाच्या औषधनिर्माण विभागातील भारतीय औषध आणि वैद्यकीय उपकरण ब्युरो (पीएमबीआय) हे औषध आणि सौंदर्यप्रसाधने कायदा व नियमांनुसार खरेदी, गुणवत्ता चाचणी, ब्रँडिंग आणि जेनेरिक औषधे आणि ईथनो-पशुवैद्यकीय औषधांचा साठा व्यवस्थापनात मदत करेल. पीएमबीआय पीएम-केएसकेएस (प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रे) आणि सहकारी संस्थांअंतर्गत उघडलेल्या नियुक्त पशुऔषधी विक्री केंद्रांना या औषधांचा पुरवठा करण्यासाठी लॉजिस्टिक व्यवस्था करेल.

केंद्रांना जेनेरिक पशुवैद्यकीय / ईथनो-पशुवैद्यकीय औषधांची खरेदी, गुणवत्ता चाचणी, ब्रँडिंग, साठवणूक आणि वाटप व वितरण पीएमबीआयच्या विद्यमान संघटनात्मक रचना व प्रक्रियांद्वारे केले जाईल. प्रत्येक संस्थेच्या संदर्भ अटी व भूमिका परिभाषित करणारा करार / एमओयू पीएमबीआय/डीओपी आणि डीएएचडी यांच्यात केला जाईल.

**पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाची भूमिका:**

पशुऔषधी विक्री केंद्रे उघडण्यासाठी अर्जदारांना अंतिम मंजुरी डीएएचडी देईल. कोणताही अर्ज मंजूर/नाकारण्याचा अंतिम अधिकार डीएएचडी राखून ठेवतो. छाननीच्या टप्प्यावर, डीओपी/पीएमबीआय, डीओसी, एमओपीआर यांना जोडले जाईल. विभागातील या उद्देशाने स्थापन केलेल्या समितीच्या शिफारशींनुसार पशुवैद्यकीय औषधांशी संबंधित सर्व तांत्रिक बाबींसाठी DAHD मदत करेल. DAHD जेनेरिक पशुवैद्यकीय औषधांच्या खरेदीसाठी आणि PM-KSK आणि सहकारी संस्थांमध्ये त्यांच्या तरतूदीसाठी PMBI, DoP ला एक-वेळ अनुदान देईल. DAHD योजनेच्या पशुऔषधी घटकाची व्यापक प्रसिद्धी देखील करेल. DAHD पात्रतेनुसार पशुऔषधी विक्री केंद्रांना प्रोत्साहन देखील देईल.

## राज्य / केंद्रशासित प्रदेशातील पशुसंवर्धन विभागांची भूमिका:

राज्य पशुसंवर्धन विभाग शेतकरी किंवा अंतिम वापरकर्त्यांमध्ये जेनेरिक / ईथनो-पशुवैद्यकीय औषधांच्या वापराबद्दल प्रचार आणि जागरूकता निर्माण करण्यास मदत करतील. ते PAVK उघडण्यासाठी योग्य ठिकाणे ओळखण्यात DAHD ला मदत करतील. राज्य सरकारी रुग्णालये आवश्यक ती कारवाई करतील आणि जेनेरिक पशुवैद्यकीय औषधांचा वापर करण्यास प्रोत्साहन देतील. तसेच, जवळच्या पीएव्हीकेकडून जेनेरिक पशुवैद्यकीय औषधांच्या खरेदीला डीएएचडी तसेच एसएएचडी कडून प्रोत्साहन दिले जाईल.

**देखरेख यंत्रणा:**

LHDCP योजनेच्या पशुऔषधी घटकाच्या अंमलबजावणीचे निरीक्षण LHDCP अंतर्गत राष्ट्रीय सुकाणू समिती (NSC) करेल. राज्य, जिल्हा आणि ब्लॉक पातळीवर पशुऔषधी घटकाचे निरीक्षण पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या कार्यकारी मार्गदर्शक तत्त्वांनुसार तयार केलेल्या राज्यस्तरीय समिती, जिल्हास्तरीय देखरेख समिती आणि ब्लॉकस्तरीय देखरेख समिती करेल.

**अर्जासोबत जोडायच्या कागदपत्रांची यादी (प्रमाणित प्रत)**

१. एजन्सी / पीएम-केएसके व सीएसचे नोंदणी प्रमाणपत्र
२. नियुक्त केलेल्या फार्मासिस्टचे फार्मासिस्ट नोंदणी प्रमाणपत्र
३. राज्य औषध नियंत्रण प्राधिकरणाकडून मिळालेला औषध परवाना
४. एजन्सीचे पॅन कार्ड
५. गेल्या दोन वर्षांचा आयटीआर
६. गेल्या ६ महिन्यांचे बँक स्टेटमेंट
७. मर्यादा गाठल्यानंतर जीएसटी नोंदणीसाठी घोषणापत्र
८. उपक्रम (जे लागू असेल ते): महिला उद्योजक/आकांक्षी जिल्हा (नीती आयोगाने ओळखलेला)
९. मार्गदर्शक तत्वांनुसार अंतर धोरण स्वीकारणे.
(वरीलपैकी कोणतेही लागू नसल्यास, सहाय्यक कागदपत्रांसह नमूद केले जाऊ शकते)

**अधिक माहितीसाठी:**

**www.dahd.gov.in**

### Annexure-II: Undertaking for availing one-time special incentive on opening of Pashu Aushadhi Vikray Kendra

We ________ (Name of PMKSK/CS) registered in ________ (Full permanent address with District, State, Pin code), is applying for Pashu Aushadhi Vikray Kendra for the location at ________ (Full address of shop) under the category of ________ (Aspirational district/ aspirational block/ Himalayan State/ Island territories/North-Eastern States).

It is to certify that our PM-KSK/CS has not availed the benefits of special incentive by opening Pashu Aushadhi Vikray Kendra in the past.

(Signature of Authorised Signatory on behalf of PM-KSK/CS)
Name of the PM-KSK/CS:
Address:
Registration number:
Pan Card No. :
Contact Number :
Email Id :

### Annexure-III: Undertaking for non-applicability of GST under provisions of GST Act

I/We ____________ (Name of the Proprietor/Karta/ Authorised Signatory, being ______________ (Designation) of ______________ (Legal Name as per PAN) do hereby state that I/We am/ are not registered under the Goods and Services Tax Act.

I/We declare that whenever we shall get ourselves registered with Goods and Services tax department; We will provide GSTIN to PMBI and DAHD.

(Signature of Applicant)
Name of the applicant :
S/o / D/o / W/o :
Aadhar No. :
Pan Card No. :
Contact Number :
Email Id :

### Annexure-IV: Undertaking on distance policy for Pashu Aushadhi Vikray Kendra

Undertaking

We have selected the above-mentioned Location for our new Pashu Aushadhi Vikray Kendra. As per Pashu Aushadhi Vikray Kendra distance Policy, I hereby declare that No Pashu Aushadhi Vikray Kendra is operating within the same Revenue Block. DAHD can take any action and can cancel my approval/application at any stage on me if I violate the distance Policy. Also, we assure that, through Pashu Aushadhi Vikray Kendra, we will serve for the people without violation of PMBI and DAHD Norms.

I do hereby declare that all the information/documents given above is true to the best of my knowledge and belief.

Thanking you
Yours faithfully
(Signature of Authorised Signatory on behalf of PM-KSK/CS)
Name of the PM-KSK/CS:
Address:
Registration number:
Pan Card No. :
Contact Number :
Email Id :

# भटक्या श्वानांचा प्रश्न : शहरी व ग्रामीण भागासाठी महत्वपूर्ण सूचना

## मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार राज्य सरकारने उचलली आवश्यक पाऊले

भटक्या श्वानांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव आणि 'मानव-श्वान संघर्ष' ही बाब सर्वोच्च न्यायालयाने अतिशय गांभीर्याने घेतली आहे. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल असलेल्या 'सिटी हाउंडेड बाय स्ट्रेज, किड्स पे प्राइस' (CITY HOUNDED BY STRAYS, KIDS PAY PRICE) या सुमोटो रिट याचिकेमध्ये वेळोवेळी दिलेल्या निर्देशांनुसार आता राज्यातील शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना राज्य सरकारच्या वतीने देण्यात आल्या आहेत. या संदर्भात नगर विकास विभाग आणि ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी अनुक्रमे २४ नोव्हेंबर २०२५ आणि २७ नोव्हेंबर २०२५ रोजी महत्त्वपूर्ण परिपत्रके निर्गमित केली आहेत.



डॉ. शिवाजी पवार
उपआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव,
महाराष्ट्र प्राणी कल्याण मंडळ, महाराष्ट्र राज्य
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७





### प्रमुख सूचना आणि कार्यवाहीचे स्वरूप

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सु-मोटो याचिका क्र.५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समिती/ग्रामपंचायती यांना राज्य शासनाने काही महत्वपूर्ण सूचना दिल्या आहेत:

### १. निर्बीजीकरण, लसीकरण आणि निवारा

• राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या कार्यक्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण (Sterilization), लसीकरण (Vaccination) आणि जंतनिर्मुलन (Deworming) करावे.

• या श्वानांसाठी आश्रय / निवाऱ्यांची सोय उपलब्ध करावी.

### २. खाण्यासाठी जागा निश्चित

· भटक्या श्वानांना खायला देण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी विशिष्ट जागा निश्चित कराव्यात.

· इतर मोकळ्या ठिकाणी श्वानांना खायला देणाऱ्या व्यक्तींविरुद्ध दंडात्मक/प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी.



### ३. सार्वजनिक ठिकाणांवर तातडीने कारवाई

- शैक्षणिक संस्था, रुग्णालये (सार्वजनिक/खाजगी), क्रीडा संकुल, बस स्टँड/डेपो (आंतरराज्य बस टर्मिनलसह) किंवा रेल्वे स्थानक यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी आढळणाऱ्या प्रत्येक भटक्या श्वानाला ताबडतोब पकडावे.
- त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरण झाल्यानंतर त्यांना नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलवावे.
- अशा श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

### ४. आरोग्य सेवा बळकट करणे

- सर्व शहरी व ग्रामीण रुग्णालयांनी (मनपा, नगरविकास, जिल्हा परिषदांच्या अधिनस्त) नेहमीच अँटी-रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिन चा अनिवार्य साठा ठेवावा.
- शहरी भागासाठी सुसज्ज पशुवैद्यकीय रुग्णालय उभारण्याच्या सूचनाही आहेत.

### ५. समन्वयासाठी नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती

- सर्व मनपा / सर्व नगरपरिषदा / सर्व नगरपंचायती यांच्यामध्ये समन्वय साधण्याकरिता आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल.
- संबंधित मनपा / नगरपरिषदा / नगरपंचातयीच्या क्षेत्रातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये (सार्वजनिक / खाजगी), क्रीडा संकुल, बस स्टँड / डेपो (आंतरराज्य बस टर्मिनलसह) किंवा रेल्वे स्थानकाच्या परिसरात आढळणाऱ्या प्रत्येक भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याची जबाबदारी तसेच अशा भटक्या श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.
- **ग्रामीण भागासाठी:** सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती यांच्यामध्ये समन्वय साधण्याकरिता संचालक, पंचायत राज महाराष्ट्र राज्य, पुणे यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल. तसेच याबाबतीत ग्रामपंचायती क्षेत्रासाठी ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती क्षेत्रासाठी गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद क्षेत्रासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय महसूल क्षेत्रासाठी अपर आयुक्त (विकास) यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

### ६. तक्रारी निवारण

- शहरी भागातील तक्रारींसाठी हेल्पलाईन क्रमांक विकसित करण्याचे निर्देश महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायतींना देण्यात आले आहेत.
- या तक्रारींचे लवकरात लवकर निवारण करावे.
- सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. या निर्देशांचे अनुपालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल, असा स्पष्ट इशारा शासनाने दिला आहे.

# वराहातील क्लासिकल स्वाईन फीव्हर (CSF) आजाराचे लक्षणे, निदान व प्रतिबंध

क्लासिकल स्वाईन फीव्हर (CSF), ज्याला हॉग कॉलरा असेही म्हणतात, हा घरगुती तसेच जंगली वरहांमध्ये आढळणारा अत्यंत संसर्गजन्य व घातक असा विषाणूजन्य आजार आहे. हा रोग *क्लासिकल स्वाईन फीव्हर व्हायरस (CSFV)* मुळे होतो, जो *पेस्टिव्हायरस (Pestivirus)* वंश आणि *फ्लॅव्हिव्हिरिडी (Flaviviridae)* कुळातील आहे. या रोगाची लक्षणे ताप, तीव्र ताप, गर्भपात व उच्च मृत्यूदर आढळतो. हा आजार वराह उत्पादन व आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी मोठा धोका मानला जातो. त्याच्या आर्थिक दुष्परिणामुळे आणि झपाट्याने पसरण्याच्या क्षमतेमुळे हा रोग *जागतिक प्राणी आरोग्य संघटना (WOAH/OIE)* ने अधिसूचित रोग म्हणून नोंदविला आहे.




**डॉ. जी. एस. सोनवणे** **डॉ. पी. पी. म्हसे**
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU), नागपूर
क्रांतिसिंह नाना पाटील पशुवैद्यकीय महाविद्यालय, शिरवळ
संपर्क ८७९६४४८७०७



### भौगोलिक प्रसार

१. **जागतिक स्तरावर:** CSF उत्तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि पश्चिम युरोपातील बहुतांश भागातून निर्मूलन करण्यात आला आहे, परंतु तो आशिया, पूर्व युरोप, मध्य व दक्षिण अमेरिका तसेच आफ्रिकेतील काही भागांत स्थानिक स्वरूपात अद्यापही अस्तित्वात आहे.

२. भारतात हा रोग प्रामुख्याने ईशान्य व पूर्वेकडील राज्यांमध्ये स्थानिक स्वरूपात आढळतो, जसे की आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा, सिक्कीम, बिहार, झारखंड आणि पश्चिम बंगाल. भारत सरकारने पशुधन आरोग्य आणि रोग नियंत्रण (LH&DC) योजनेअंतर्गत क्लासिकल स्वाइन फिव्हर नियंत्रण कार्यक्रम (CSF-CP) राबविला आहे, ज्याद्वारे लसीकरण व रोगनियंत्रणाद्वारे रोगाचे प्रमाण कमी केले जात आहे.

### रोगाचा प्रसार

मुख्य संक्रमण स्रोत म्हणजे संक्रमित व निरोगी डुक्करांमधील थेट संपर्क. हा संपर्क नाक, तोंड, डोळ्यांचे स्राव, मूत्र व विष्ठेमधून होतो.





**अप्रत्यक्ष प्रसार:**

- दूषित खाद्य, उपकरणे, वाहने व कपडे
- संक्रमित डुकराचे मांस किंवा त्याचे पदार्थ खाऊ घालणे
- संक्रमित वन्य डुक्करांच्या संपर्कातून

हा विषाणू अत्यंत घातक असून तो फ्रीजमधील मांसात काही महिने आणि गोठवलेल्या मांसात अनेक वर्षे जिवंत राहू शकतो. विषाणू दीर्घ-अंतरावर हवेच्या मार्गाने प्रभावीपणे पसरत नाही, परंतु इतर संपर्क मार्गाने आणि तोंडाच्या मार्गाने संक्रमण जास्त होते. ते जिवंत प्राण्यांनाच मुख्यत: संसर्ग करतात आणि प्राण्याच्या शरीरात सक्रीय होऊन त्यांची संख्या वाढते. मात्र, जिवंत प्राण्याच्या शरीराबाहेर वातावरणात किंवा मृत प्राण्यात ते निर्जीव कण स्वरुपात असतात. थंड वातावरणात व्हायरस जास्त काळ टिकतो.

**रोगाची लक्षणे**

लक्षणे विषाणूच्या प्रकारानुसार, वयानुसार आणि डुकरांच्या रोगप्रतिकार क्षमतेनुसार बदलतात. बहुतेक प्रकरणांमध्ये आजाराचा उद्रेक कालावधी ७ ते १० दिवसांचा असतो. सुरुवातीला आजाराचे सामान्य वैद्यकीय लक्षणे एक ते दोन आठवड्यांपर्यंत दिसुन येत नाहीत. मात्र दृश्य वैद्यकीय लक्षणे साधारणपणे २ ते ४ आठवड्यांनंतर दिसून येतात. आजाराचा कालावधी ३ ते ४ आठवडे असतो. संसर्गानंतर पाचव्या आठवड्यापर्यंत मृत्यू देखील होऊ शकतो. आजारी प्राणी १०-१५ दिवसांच्या संसर्गानंतर एका जागी जमा होऊन एकमेकांना दाटीने चिकटून राहतात, आजारी प्राण्यांची पाठ वाकलेला दिसते, वराहांचे डोळे सुज आल्याने तीव्र लालसर दिसतात, चेहरा, कान आणि पायाभोवती त्वचेमध्ये तीव्र निळसरपणा दिसून येतो, मेंदु ज्वराची लक्षणे दिसून येतात, वराह उभे राहू शकत नाहीत, काही लडखडत वावरतात, कान निळे, जांभळे दिसू लागतात आणि वराह मृत पावतात, या आजारात वराह आजाराच्या प्रसाराचे आणि मृत्युदाराचे प्रमाण १००% पर्यंत असू शकते.

**तीव्र स्वरूप:**

तीव्र ताप (४०-४१°C), नैराश्य, भूक मंदावणे किवा खाणे बंद, डोळ्यांच्या बुबुळाच्या पुढील भागाचा होणारा दाह आणि बद्धकोष्ठता व त्यानंतर अतिसार. डुकरांच्या त्वचेवर लालसर ते जांभळा रंग येऊ शकतो, विशेषतः कान, पोट आणि पायांवर. काही तीव्र प्रकरणांमध्ये, शवविच्छेदनात कोणतेही गंभीर बदल आढळत नाहीत. अत्यंत विषाणूजन्य CSFV स्ट्रेनमुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते आणि मृत्युदर जास्त असतो.

**दीर्घकालीन स्वरूप:**

सर्वसाधारण भाषेत, जेव्हा संक्रमित प्राण्यांचे जगणे ३० दिवसांपेक्षा जास्त असते तेव्हा संसर्ग दीर्घकालीन मानला जातो. अधूनमधून येणारा ताप, वाढ खुंटणे, क्षीणपणा, कृशता आणि वारंवार जुलाब. रक्तामध्ये विषाणूंचे प्रतिपिंड (Antibodies) दोन आठवड्यांनंतर किंवा नंतर काही प्रमाणात आढळू शकतात, परंतु सहसा दीर्घ काळ राहत नाहीत. अशा आजारी प्राण्याच्या शरीरातून व्हायरसचे उत्सर्जन संसर्गाच्या चौथ्या दिवसापासून प्राण्याच्या मृत्यूपर्यंत दिसून येते. आजारी वराह उदास, वाकलेले आणि भूक मंदावलेले असतात; वरच्या भागात शेपटाभोवती रक्तस्त्राव आणि त्वचेखाली रक्त साकळलेले दिसून येते; समान वयाच्या कळपामध्ये शरीराने लहान मोठे वाढ खुंटलेली पिले दिसून येतात आणि अतिसार असलेले प्राणी मृत्यूपर्यंत मोठ्या प्रमाणात विषाणुचे उत्सर्जन करतात.

**गाभण वराह माद्या:** गर्भपात, मृत पिल्ले जन्माला येणे, व पिलांमध्ये जन्मजात थरथरणे. संक्रमित प्राणी संसर्गाचा कायमस्वरूपी स्त्रोत असतो व इतर प्राण्यांना आजार पसरवू शकतो. आईच्या गर्भातील पिल्लांना बाधा होते व जन्मानंतर ते जिवंत राहतात; परंतु त्या दरम्यान त्यांच्या शरीरातून विषाणू मोठ्या प्रमाणात बाहेर पडत राहतात.

### निदान

रोगाचे निदान वैज्ञानिक लक्षणे, शवविच्छेदनातील बदल आणि प्रयोगशाळा तपासणीनुसार केले जाते.

**नमुने:** रक्त, टॉन्सिल, प्लीहा, लसीका ग्रंथी, मूत्रपिंड.

**प्रयोगशाळा चाचण्या:**

- RT-PCR: विषाणूचे जीनोम शोधण्यासाठी
- ELISA: प्रतिजन आणि प्रतिपिंड शोधण्यासाठी
- विषाणू पृथक्करण व इम्युनोफ्लुरोसन्स चाचण्या

**अचूक निदान:** आफ्रिकन स्वाईन फीव्हर (ASF), एरिसिपेलस, साल्मोनेलोसिस.

### प्रतिबंध व नियंत्रण


- **जैवसुरक्षा:** उच्च स्वच्छता, निर्जंतुकीकरण व पाळीव डुक्कर व जंगली/मोकाट डुक्करांमधील संपर्क टाळणे.
- **वाहतूक नियंत्रण:** प्रभावित भागांतील वराह व मांस वाहतूक थांबविणे.
- **स्टॅम्पिंग-आऊट धोरण:** संक्रमित व संपर्कात आलेल्या प्राण्यांची त्वरित विल्हेवाट लावणे व परिसर निर्जंतुक करणे.
- **लसीकरण:** स्थानिक भागांत *CSF जिवंत लस* वापरणे.
- **निगराणी:** राष्ट्रीय नियंत्रण कार्यक्रमांतर्गत देखरेख व अहवाल.

### सार्वजनिक आरोग्य धोका


CSF हा मानवांमध्ये पसरणारा रोग नाही (झुनोटिक नाही). तथापि, डुक्कर पालनावर आधारित उपजीविकेवर व डुक्कर मांसाच्या व्यापारावर त्याचा गंभीर आर्थिक परिणाम होतो.

#### CSF नियंत्रण कार्यक्रमातील अडचणी


- वराहपालकांत ह्या रोगाविषयी जागरूकतेचा अभाव.
- रोगनिदान व जलद तपासणीसाठी प्रशिक्षणाची गरज.
- CSF सर्वेक्षणासाठी आर्थिक सहाय्याची आवश्यकता.
- योग्य प्रयोगशाळा सुविधा अपुरी.
- रोगासंबंधी आणखी संशोधनाची आवश्यकता.
- लसींचा अपुरा पुरवठा व मर्यादित निधी.
- रोग सर्वेक्षण व रोगशास्त्र विषयक प्रशिक्षणाचा अभाव.
- रोग ओळखण्याविषयीचे अपुरे ज्ञान.



CSF आजाराचे तीव्र स्वरूपाचे लक्षणे



CSF आजाराचे दिर्घ स्वरूपाची लक्षणे



CSF शवविच्छेदनातील विविध अवयव बदल

# ओझोन प्रक्रिया: पशुपालन व्यवसायात ओझोन प्रक्रियेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतकऱ्यांसाठी व्यावसायिक संधी






**डॉ. मनोजकुमार जनार्दन आवारे**
विभाग प्रमुख- पशुपोषण व
पशुआहार शास्त्र,
बायफ, उरुळी कांचन, पुणे

पावसाळा वगळता अन्य ऋतुंमध्ये चाऱ्याची कमतरता जाणवून येते. अशा परिस्थितीमध्ये चाऱ्याची टंचाई हा पशुपालकांमध्ये चिंतेचा विषय असतो. दुग्ध व्यवसायामध्ये चाऱ्याचे नियोजन आणि पशु आहाराचे अनन्यसाधारण महत्व आहे. पशुपालक दुग्धव्यवसायामध्ये ७० ते ८० टक्के खर्च हा प्रामुख्याने पशुआहारावर करत असतो. चाऱ्याची टंचाई असल्यास अशा परिस्थितीमध्ये शेतातील पीक काढणीनंतर शिल्लक पीक अवशेषांवर विविध प्रक्रिया करून त्यांचे पोषणमुल्य सुधारता येईल व उत्पादन खर्चातही बचत होईल.



दुग्ध व्यवसायामध्ये चाऱ्याचे नियोजन व पशु आहाराचे अनन्यसाधारण महत्व आहे. जनावरांच्या आहारामध्ये विविध पौष्टिक तत्त्वे जसे की प्रथिने, स्निग्ध पदार्थ, तंतुमय पदार्थ, उर्जा, खनिजे व जीवनसत्वे, पाणी, इत्यादी गरजेचे असतात. अशी पौष्टिक तत्त्वे आहाराच्या विविध माध्यमातून जनावरांना मिळत असतात. सर्वसाधारणपणे १० लिटर दूध देणाऱ्या संकरीत गायींसाठी २५ ते ३० किलो हिरवा चारा (२१ किलो एकदलीय आणि ९ किलो द्विदलीय), ३ ते ४ किलो वाळलेला चारा, ४ ते ५ किलो पशुखाद्य, ५० ते ६० ग्राम खनिज मिश्रण आहाराच्या माध्यमातून द्यावे लागतात.

**ओझोन प्रक्रिया:** विविध पिकांच्या अवशेषांचा समावेश पशुधनाच्या आहारामध्ये गोळी पेंडयुक्त संपूर्ण पशुखाद्याच्या स्वरुपात केला जाऊ शकतो, जेणेकरून आहाराचा खर्च कमी करता येईल आणि जमिनीच्या उपलब्धतेमुळे पशुधन संगोपनात येणाऱ्या अडचणींवर मात करता येईल. मराठवाडा आणि विदर्भासारख्या भागामध्ये कापसाची फराटी भरपूर प्रमाणात असते आणि ती सर्वसाधारणपणे शेतातच कुजवली जाते किवा जाळली जाते.




तिच्यात असणाऱ्या काही अपचनीय तत्त्वे जसे की लिग्निन हे त्यातील पचानिय घटक सुद्धा सेल्युलोज फायबरने बद्ध करतात आणि लिग्नोसेल्युलोसिक बंधाची उपस्थिती हे तिचा पशुआहारात वापर करण्यास अडथळा ठरतात. अशाप्रकारचे लिग्नोसेल्युलोसिक बंध हे खूप कठीण असतात त्यामुळे ते जनावरांना चावायला आणि पचवायला उपयुक्त नसतात. लिग्निन हे हानिकारक तत्त्व त्या कापसाच्या फराटीला जनावरांसाठी अपचनक्षम बनवते. हायड्रोजन पेरोक्साईड, ओझोन, ऑक्सिजन किंवा हवा यासारख्या ऑक्सिडायझिंग एजंटसह प्रक्रिया करून लिग्नोसेल्युलोजचे डिलिग्निफिकेशन साध्य करता येते. बायफ, उरुळी कांचन, पुणे, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई आणि पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर ह्यांच्या संयुक्त विद्यमाने बायफ येथील संशोधन पथकाने अलीकडेच कापसाच्या पऱ्हाटीची पचनक्षमता वाढविण्यासाठी नवीन "ओझोन प्रक्रिया" पद्धतीवर काम केले आहे. त्यामार्फत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई ह्यांच्या सहकार्यातून बायफमधील पशुपोषण व पशुआहार शास्त्र विभागामध्ये पऱ्हाटीवर ओझोने प्रक्रियेचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. ओझोन प्रक्रियेमुळे निकृष्ट दर्जाच्या पिकांच्या अवशेषांचे दर्जेदार पशुखाद्यात रूपांतर करून निकृष्ट दर्जाच्या कापसाच्या पऱ्हाटीची पचनक्षमता वाढवणे, जनावरांचे वजन वाढवणे तसेच दूध उत्पादनात सुधारणा करणे देखील ओझोन प्रक्रियेमुळे सुनिश्चित होते. अशाप्रकारे आपण पशुआहारावरील खर्च कमी करून दुग्ध व्यवसाय फायद्यात आणू शकतो.

**ओझोन प्रक्रिया पद्धत:** प्रथमतः शेतातून कापसाच्या फराटी बारीक कुट्टी करून घ्याव्या आणि त्यांनतर त्या प्लास्टिकच्या टाकीमध्ये रात्रभर भिजवत ठेवाव्या; जेणेकरून त्यामधील टणकपणा कमी होईल. त्यानंतर, त्याच टाकीमध्ये ओझोन वायू प्रवाहित करून किमान चार ते पाच तास ओझोन प्रक्रिया करावी. त्यासाठी बाजारात उपलब्ध असलेल्या ओझोन जनरेटरचा वापर करावा, जे की हवेतील ऑक्सिजनचे रुपांतर ओझोनमध्ये करण्यासाठी मदत करते. छोट्या प्रमाणत ओझोन प्रक्रिया करण्यासाठी ओझोन सिलिंडरचा सुद्धा वापर करता येतो. अशाप्रकारे ओझोन प्रक्रियेसाठी सर्वसाधारणपणे पन्नास पैसे प्रती किलो इतका अतिरिक्त खर्च येतो, जो की त्यापासून होणाऱ्या फायद्याच्या तुलनेत अगदी अल्प प्रमाणत आहे. त्यानंतर अशाप्रकारे ओझोन प्रक्रिया केलेल्या कापसाच्या फराटी टाकीमधून काढून घेवून हवेमध्ये किंवा पावसाळ्यामध्ये ड्रायरमध्ये वाळवून घ्यावे; जेणेकरून त्यामधील आर्द्रता कमी होवून ते बऱ्यापैकी शुष्क होईल.

**संपूर्ण आहार बनवणे:** ओझोन प्रक्रिया करून वाळवलेल्या कापसाच्या पऱ्हाटी आणि इतर पशुखाद्याचे पोषक घटक वापर करून एका विशिष्ठ तंत्रज्ञानाने संपूर्ण आहाराच्या कांड्या (Complete Feed Pellets) बनवता येतात.





या संपूर्ण आहाराच्या कांड्यापासून जनावरांस सर्व प्रकारची पौष्टिक तत्वे (प्रथिने कार्बोदके उर्जा तंतुमय पदार्थ, खनिजे व जीवनसत्वे इत्यादी) संतुलित प्रमाणात मिळतात. अशा प्रकारच्या संपूर्ण आहाराच्या कांड्या बनवताना आपण त्यामध्ये कापसाच्या फराटी सोबत इतर वाळलेला चारा जसे की, गव्हाचे काड, तूस, सोयाबीनचे तूस, तुरीचे काड इत्यादी एकूण ६० किलो आणि पशुखाद्य किवा पशुखाद्याचे घटक जसे की, विविध पेंडी, गहू भुसा, खनिज मिश्रण, मीठ, गुळ किवा उसाची मळी इत्यादी एकूण ४० किलो वापरावे. हे सर्व घटक एकत्र भरडून आणि मिसळून तयार होणाऱ्या भुश्याला एका विशिष्ट अशा कांड्या तयार करण्याच्या पेलेटायझर यंत्रातून संपूर्ण आहाराच्या कांड्या बनवून घ्याव्यात. अशा प्रकारचा संपूर्ण आहार आणखी विविध स्वरुपात जसे की भुसा, ठोकळा बनवता येतो. ठोकळा बनवण्याचे मशीन वापरून संपूर्ण आहाराचे ठोकळे तयार करू शकतो. भारतीय कृषी संधान परिषद (ICAR) नवी दिल्ली या संस्थेने ठोकळा आहार बनवण्यासाठी तयार केलेल्या या मशीन फार उपयुक्त आहेत. अशाप्रकारे बनवलेल्या ठोकळ्यामध्ये किमान १३ ते १५ टक्के प्रथिने व ६५ ते ७० टक्के पचनीय घटक असतात की, जे जनावरांच्या वाढीसाठी व दूध निर्मितीसाठी मदत करतात. त्यासाठी यामध्ये कुठल्याही प्रकारचा वाळलेला चारा पशुखाद्य किवां पशुखाद्याचे घटक, खनिज मिश्रण, मीठ, उसाची मळी इत्यादी घटकांचे मिश्रण करून संपूर्ण आहाराच्या कांड्या (Pellets) बनवल्या जातात.

**संपूर्ण आहाराचे फायदे:**

अशाप्रकारचे ओझोन प्रक्रिया करून वाळवलेल्या कापसाच्या पऱ्हाटी आणि इतर पशुखाद्याचे पोषक घटक वापरून बनवलेला संपूर्ण पशु आहार जनावरास खावू घातल्यामुळे खालील फायदे होतात.

१. पूरक पौष्टिक तत्वे योग्य प्रमाणात मिळतात.
२. चवदार असल्याने मुबलक प्रमाणात ग्रहण केले जाते.
३. ओझोन प्रक्रियेमुळे पचनियता वाढते.
४. ऐच्छिक घटक खाणे टळून सर्व घटक खाल्ले जातात.
५. सर्व प्रकारच्या वाळलेल्या चाऱ्याचा व कापसाच्या पऱ्हाटीचा दर्जा सुधारून उच्य दर्जाचा बनवला जातो.
६. कांडी किवा ठोकळा स्वरूपामुळे चारा व खाद्य वाया जात नाही तसेच ते जास्त काळ टिकवून ठेवता येते.
७. वाळलेल्या चाऱ्याची घनता कमी होवून संपूर्ण पशुखाद्याची वाहतूकही सोयीची होते.
८. दूध उत्पादन व स्निग्धांश वाढण्यास मदत होते.
९. अशाप्रकारच्या ओझोन प्रक्रिया करून वाळवलेल्या कापसाच्या पऱ्हाटी आणि इतर पशुखाद्याचे पोषक घटक वापरून बनवलेल्या संपूर्ण आहाराच्या कांड्या वापरून पारंपारिक पशुखाद्याच्या तुलनेत किलोमागे सर्वसाधारणपणे दोन ते तीन रुपयांनी खर्च कमी होतो.

**संपुर्ण आहाराच्या कांड्या खाऊ घालण्याचे प्रमाण:**

सर्वसाधारणपणे एका दुभत्या जनावरास १२ ते १५ किलो संपूर्ण आहाराच्या कांड्या थोड्या प्रमाणात हिरवा चारा खावू घातल्यास १० ते १२ लिटर दूध मिळू शकते. अशा प्रकारचे तंत्रज्ञान वापरून उत्तम जनावरांची निवड, योग्य आहार व्यवस्थान आणि दैनंदिन व्यवस्थापन जर केले तर दुग्धव्यवसायामध्ये नक्कीच फायदा होवू शकेल.

# देशी कुक्कुटपालनातून उद्योजकता विकास



पशुपालन हा भारतात जुन्या काळापासून चालत असलेला शेतीचा उत्तम असा जोडधंदा आहे. परंतु बदलत्या काळानुसार पशुपालन हा नुसता जोडधंदा न राहता तो दिवसेंदिवस मुख्य व्यवसाय बनत असून त्यामध्ये अनेक उद्योजक तयार होत आहेत. पशुपालनामध्ये प्रामुख्याने दूध उत्पादन, शेळी/मेंढीपालन, कुक्कुटपालन, वराह पालन, पशुखाद्य निर्मिती व्यवसाय व इतर बऱ्याचशा पशुपालन संबंधी व्यवसायातून नवीन उद्योजक घडत आहेत. त्यातीलच वेगाने वाढत असलेला व्यवसाय म्हणजेच कुक्कुटपालन. बऱ्याच वर्षापासून कुक्कुटपालनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये महत्त्वाचा वाटा आहे. जरी व्यावसायिक ब्रॉयलर व लेयर कोंबडीपालन मोठ्या प्रमाणात वाढत असले तरीदेखील आजही विविध रंगांच्या शुद्ध देशी तसेच सुधारित देशी कोंबड्यांचे पालन किंवा यांचा कुक्कुटपालन व्यवसाय करणारा विशिष्ट वर्ग शेतकऱ्यांमध्ये आहे, तसेच यांच्या मांसाची व अंड्यांची मागणी असणारा देखील विशिष्ट वर्ग ग्राहकांमध्ये आहे.



**डॉ. अतुल पाटणे**
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
अकोले , जि. अहिल्यानगर

उर्वरीत पुढील पृष्ठावर...

कुक्कुटपालनातून उद्योजकता विकास जर करायचा असेल तर व्यावसायिक दृष्टिकोन व शास्त्रोक्त पद्धतीने हा व्यवसाय करणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यवस्थापन हा व्यवसायाचा महत्त्वाचा भाग आहे. योग्य व अचूक व्यवस्थापनाशिवाय व्यवसाय यशस्वी होऊ शकत नाही, त्यामुळे व्यवस्थापनातील खालील तांत्रिक बाबींचे माहिती असणे आवश्यक आहे. व्यवस्थापनात प्रथमतः कोंबड्यांचे संगोपन कोणत्या पद्धतीने करणार आहोत ते ठरवावे.

**कुक्कुटपालनाच्या पद्धती -**

**१. मुक्तसंचार पद्धत** - या पद्धतीमध्ये कोंबड्या मोकळ्या सोडल्या जातात व फक्त रात्रीच्या वेळी निवाऱ्याची सोय केली जाते. दिवसभर मोकळ्या रानात फिरून किडे, पाला, गवत किंवा इतर खाद्य खाऊन ते वाढत असतात.

**२. अर्धबंदिस्त पद्धत**- गावरान देशी किंवा सुधारित देशी कोंबडी पालनासाठी अतिशय प्रभावी व प्रचलित संगोपन पद्धत आहे. या पद्धतीमध्ये कोंबड्यांना ठराविक क्षेत्रामध्ये कुंपण घालून मोकळ्या सोडल्या जातात त्यामध्ये त्यांना निवाऱ्यासाठी शेड केले जाते व शेडमध्ये खाद्याची व पिण्याच्या पाण्याची सोय तसेच अंडी घालण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाते. अतिशय कमी खर्चात या पद्धतीमध्ये व्यवसाय सुरू करता येतो.

**३. बंदिस्त पद्धत**- ज्या ठिकाणी जागेची कमतरता आहे तसेच व्यवसायात पुढे जाऊन विस्तार करण्याचा विचार आहे अशावेळी कुक्कुटपालन करण्यासाठी बंदिस्त पद्धत अतिशय योग्य आहे. या पद्धतीमध्ये सुरुवातीचा भांडवली खर्च अधिक असला तरी कमी जागेत जास्त पक्षी संगोपन केले जाऊ शकतात.

**बंदिस्त कुक्कुटपालनाचे प्रकार -**

**अ. गादी पद्धत/डीप लिटर**- या पद्धतीमध्ये पक्षी गादीवर म्हणजेच तूस किंवा भुसाच्या थर जमिनीवर अंथरून त्यावर ठेवले जातात. मांस उत्पादनासाठी जे पक्षी पाळले जातात त्यासाठी ही पद्धत चांगली आहे.

**ब. पिंजरा / केज पद्धत**- या पद्धतीमध्ये पक्षी विशिष्ट प्रकारे तयार केलेल्या पिंजऱ्यामध्ये ठेवले जातात. स्वच्छ अंडी उत्पादनासाठी जे पक्षी पाळले जातात त्यासाठी ही पद्धत चांगली आहे.

वरील कोणत्याही पद्धतीत संगोपन करत असताना पिल्ले व मोठ्या कोंबड्या नेहमी स्वतंत्र व वेगवेगळ्या शेडमध्ये ठेवाव्यात.










**संतुलित आहार व्यवस्थापन-**

व्यावसायिक ब्रॉयलर व लेयर कोंबड्यांच्या खाद्याच्या खर्चापेक्षा सुधारित देशी कोंबड्यांच्या खाद्याचा तसेच संगोपनाचा खर्च अतिशय कमी येत असतो. त्यामुळे मका, सोयाबीन, ज्वारी, तांदळाचा कोंडा व खनिज मिश्रण यांच्यापासून बनलेला संतुलित आहार कोंबड्यांना दिल्याने त्यांची वाढ झपाट्याने होऊन वेळेत वजन वाढते व अंडी उत्पादन देखील वेळेत सुरू होऊन चांगले उत्पादन मिळते. कुक्कुटपालनाच्या खर्चामध्ये ६० ते ७० % खर्च हा खाद्यावरती होत असतो. त्यामुळे खाद्यावरील खर्च कमी करण्यासाठी कोंबड्यांना त्यांच्या खाद्यात २५ ते ३०% पर्यंत अझोला, भाजीपाला वेस्ट, शेवग्याचा पाला, लसूण घास समाविष्ट करुन खाद्यावरील खर्चात बचत करू शकतो.

**पाणी व्यवस्थापन-** व्यवस्थापनातील हा भाग दुर्लक्षित होणारा परंतु खूप महत्त्वाचा आहे. पिल्लांना तसेच कोंबड्यांना स्वच्छ व पिण्यायोग्य पाणी देणे गरजेचे आहे कारण बरेचसे रोग हे पाण्यामार्फतच होत असतात. तसेच पक्षांची पचनक्रिया व्यवस्थित होण्यासाठी देखील पाणी महत्त्वाचे काम करते. बऱ्याचदा पाणी खराब अस्वच्छ किंवा पाण्याचा हार्डनेस जास्त असल्याने पक्षी पाणी पीत नाहीत किंवा कमी पितात. त्यामुळे वर्षातून किमान एकदा तरी पिण्याच्या पाण्याचा टीडीएस (TDS) व हार्डनेस (hardness) प्रयोग शाळेतून तपासणी करून घ्यावी. तसेच पिण्याच्या पाण्याची भांडी दररोज तर पाण्याची टाकी आठवड्यातून एकदा तरी स्वच्छ धुवावी. पाण्यात योग्य प्रमाणात अदलून बदलून वेगवेगळे सॅनिटायझरचा वापर करावा.

**४. कोंबड्यांच्या जातीची निवड-** देशी किंवा गावरान कोंबडीचे उत्पादन क्षमता मर्यादित आहे. तसेच मोठ्या प्रमाणात एकाच वेळी पिल्ले मिळण्यासही अडचण आहे. त्यामुळे व्यावसायिक कुक्कुटपालनमध्ये त्यांच्याऐवजी सुधारित देशी जातीच्या कोंबडीचे पालन केल्यास त्यांचे उत्पादनदेखील देशी व गावरान कोंबडीपेक्षा जास्त मिळत असल्याने त्या फायदेशीर आहेत. तसेच सुधारित जातीच्या कोंबड्यांमध्ये स्थानिक वातावरणाशी जुळवून घेण्याची आणि आजाराचा सामना करण्याची क्षमता अधिक असल्याने त्यांच्या मरतूक कमी होते व उत्पादन चांगले मिळते.

सुधारित देशी जातीच्या कोंबड्या- गिरीराज, वनराज, कावेरी, डी पी क्रॉस, सातपुडा, सोनाली

**गावरान/देशी कोंबडी व सुधारित देशी जातीची कोंबडी फरक:**

| अ.क्र. | गावरान देशी कोंबडी | सुधारित देशी कोंबडी |
|---|---|---|
| १ | वजन-१.५ किलो-५-६ महिने | वजन-१.५ किलो-३-४ महिने |
| २ | अंडी उत्पादन-७०-८०/वर्षी | अंडी उत्पादन-१५०-१६०/वर्षी |
| ३ | अंडी देण्यास सुरुवात: ७-८ महिन्यानंतर | अंडी देण्यास सुरुवात: ५-६ महिन्यानंतर |
| ४ | खुडूकपणा खूप वेळ राहतो | खुडूकपणा कमी वेळ राहतो प्रमाणात |
| ५ | अंडी उत्पादन व fertlity प्रमाणात कमी मिळते | अंडी उत्पादन व चांगली fertlity मिळते |

**जैवसुरक्षा-** प्रक्षेत्रावर जैवसुरक्षा म्हणजेच बायो सिक्युरिटीचे पालन करणे खूप महत्त्वाचे आहे. रोगप्रतिबंधासाठी हा अतिशय प्रभावी व्यवस्थापनाचा भाग आहे. याबाबतीत आपण सखोल व स्वतंत्र माहिती पुढील जैवसुरक्षिततेच्या लेखात बघूया.

**प्रशिक्षण-** कोणत्याही व्यवसायाचे तांत्रिक व शास्त्रोक्त माहिती घेतल्यानंतरच तो व्यवसाय चालू करावा आणि त्यासाठी प्रशिक्षण हा महत्त्वाचा भाग आहे. कुक्कुटपालनाविषयी प्रशिक्षण हे पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य तसेच महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर मार्फत महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात दिले जाते.

पशुसंवर्धन विभागामार्फत कुक्कुटपालन विषयक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था- मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कुक्कुटपालन प्रशिक्षण केंद्र मुरुड, जि. लातूर, अमरावती व कणकवली जि. सिंधुदुर्ग.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत विविध पशुवैद्यकीय महाविद्यालयांमार्फत कुक्कुटपालन विषयक प्रशिक्षण देणाऱ्या संस्था-मुंबई, नागपूर, परभणी, शिरवळ, अकोला व उदगीर येथे आहेत. तरी इच्छुकांनी व कुक्कुट व्यावसायिकांनी वरील ठिकाणी भेट देऊन माहिती घ्यावी.

**विक्री व्यवस्थापन (मार्केटिंग)**

१. कुक्कुटपालकांनी संघटित चॅनेल निर्माण करावा व एकत्रित मोठ्या शहरांमध्ये थेट एकसारखा पुरवठा करता येईल याचे नियोजन करावे.

२. वर्षाचे कॅलेंडर बघून पक्षांचे बॅच टाकण्याचे नियोजन करावे. ठराविक सणांच्या काळात खूप मागणी असते. उदा. दसरा, दिवाळी, ३१ डिसेंबर, नवीन वर्ष, ख्रिसमस, होळी, आखाडाचा महिना तसेच थंडीच्या दिवसात अंड्यांना जास्त मागणी असते,.

३. जास्तीत जास्त लोकल बाजारपेठ, हॉटेल्स, हॉस्पिटल्स यामध्ये आपले उत्पादन जाईल याकडे लक्ष द्या व त्यांना एक सारखा पुरवठा होईल याचे नियोजन करा.

४. स्वतःचे रिटेल शॉप टाकू शकता. आपल्या उत्पादनाचा स्वतंत्र ब्रँड विकसित करा.

५. सोशल मीडियाचा (प्रसार माध्यमांचा) उपयोग उत्पादनाचा ब्रँड विकसित करून विक्री वाढविण्यासाठी करावा.

# समीर इस्माईल शेख यांचे यशस्वी कुक्कुटपालन






होटगी (ता. दक्षिण सोलापूर) येथील समीर इस्माईल शेख यांनी पशुसंवर्धन विभागाच्या सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथून १५ दिवसीय प्रशिक्षण घेतल्यानंतर स्वतःचा व्यवसाय उभा केला आहे. विशेष म्हणजे, ते स्वतःच्या फार्मवर 'अझोला' खाद्य तयार करून उत्पादन खर्च कमी करत आहेत. समीर शेख यांची ही यशोगाथा ग्रामीण तरुणांना व्यवसाय प्रशिक्षण आणि स्वयंरोजगाराचे महत्त्व पटवून देणारी आहे.

समीर इस्माईल शेख यांनी पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या १५ दिवसीय कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणाचा लाभ घेऊन एक प्रेरणादायी यशोगाथा साकारली आहे. प्रशिक्षणामुळे मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून समीर यांनी आपला स्वतःचा कुक्कुटपालन व्यवसाय सुरू करण्याचा दृढ निश्चय केला.

**स्वबळावर उभारलेला कुक्कुटपालन व्यवसाय**

प्रशिक्षणातून मिळालेल्या आत्मविश्वासामुळे त्यांनी स्थानिक बाजारपेठेतून ६०० अंड्यांची क्षमता असलेले हॅचर (Hatcher) विकत घेतले. आज त्यांच्या फार्मवर देशी/गावरान जातीचे पक्षी समाधानकारक स्थितीत आहेत:

मोठे पक्षी: ४००

लहान पक्षी (२ महिन्यांचे): २००

एक दिवसाचे पिल्ले: १००

एकूण पक्षी संख्या: ५५०

समीर शेख केवळ पक्षी वाढवत नाहीत, तर पिलांची विक्रीही खुल्या बाजारात तसेच किरकोळ स्वरुपात करतात. त्यांनी तीन दिवसाचे कुक्कुट पिल्लू ₹४५/- प्रती पिल्लू या दराने विकले आहेत, ज्यामुळे त्यांना चांगला नफा मिळाला आहे.

**उत्पन्नाचे स्रोत आणि नाविन्यपूर्ण खाद्य व्यवस्थापन**

उत्पन्नाचा दुसरा मुख्य स्रोत म्हणजे अंड्यांची निर्मिती. त्यांच्या फार्मवर दररोज ७० ते ८० अंड्यांचे उत्पादन होत आहे, ज्याची विक्री स्थानिक बाजारपेठेत केली जाते. देशी / गावरान अंड्यांना बाजारात चांगली मागणी आणि किंमत असल्याने, हा व्यवसाय त्यांच्यासाठी सातत्याने फायदेशीर ठरत आहे. हा व्यवसाय यशस्वी करण्यासाठी त्यांना पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहंका बोधनकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे.

समीर शेख यांनी त्यांच्या फार्मवर 'अझोला' तयार करण्याची नाविन्यपूर्ण पद्धत अवलंबली आहे. अझोला हे प्रथिनयुक्त आणि पौष्टिक खाद्य असल्यामुळे ते पक्ष्यांच्या खाद्यात त्याचा वापर करतात. यामुळे खाद्यावरील खर्च कमी होतो आणि पक्ष्यांचे आरोग्यही उत्तम राहते. हा व्यवसाय केवळ फायदेशीर ठरला नाही, तर प्रशिक्षणाने त्यांना योग्य मार्गदर्शन केले आणि यशस्वी उद्योजक म्हणून नावलौकिक मिळवून दिला आहे. समीर इस्माईल शेख यांची ही यशोगाथा ग्रामीण भागातील तरुणांसाठी एक आदर्श आहे, जी दर्शवते की योग्य प्रशिक्षण आणि कठोर परिश्रमाने कोणताही व्यवसाय यशस्वी करता येतो.

# डांगी जनावरांची जोपासना



नाशिक जिल्ह्यात प्रामुख्याने इगतपुरी, त्र्यंबकेश्वर व दिंडोरी यासह अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले व संगमनेर या तालुक्यात व पालघर, ठाणे या पश्चिम किनारपट्टीवरील जिल्ह्यांतही डांगी पशुधन मोठ्या प्रमाणावर आढळून येते. भौगोलिक स्थिती पहाता डोंगराळ तसेच सपाट, अतिपावसाचा, मध्यम पावसाचा, अगदी कमी पावसाचा प्रदेश; शिवाय काळ्याभोर जमिनीपासून ते तांबड्या मातीसारखी पाण्याचा निचरा होणारी जमीन, लहान लहान खाचरे, डोंगर उतार अशा भागात शेतीकामासह ओढकामासाठी डांगी पशुधनाचा चांगला वापर होतो.



**डॉ. मिलिंद भणगे**
सहायक आयुक्त पशुसंवर्धन
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, नाशिक

जास्त पावसाच्या आणि डोंगर उताराच्या व खाचरांची जमीन असलेल्या भागात डांगी या जातीची जनावरे फारच उपयुक्त आहेत. डांगी या गायीच्या जातीचे जे गुणधर्म आहेत त्यानुसार ही जात जास्त पावसाच्या प्रदेशात तसेच डोंगर उतारावरील जमिनी या ठिकाणी उपयोगी ठरलेली आहे. ह्या सर्व गोष्टी जरी नैसर्गिक असल्या तरी जोपासनेचे योग्य तंत्र अवलंबल्यास या पशुधनापासून जास्त फायदाच होतो. जनावरांचे आयुष्य वाढते. जनावरांवर होणारा अनाठायी खर्च कमी होऊन दूध उत्पादन क्षमताही वाढविणे शक्य होते.

डांगी पशुधनापासून जास्तीत जास्त फायदा योग्य मोबदल्यात घ्यावयाचा असेल, तर त्यासाठी जनावरांची जोपासना / संगोपन / व्यवस्थापन त्यांचे खाद्य आणि जनावरांची शुद्ध पैदास या गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्यावयास पाहिजेत. त्या परिस्थितीत ज्ञानाचा योग्य उपयोग करुन फायदा मिळविणे म्हणजे खरोखर योग्य जोपासना झाली, असे म्हणता येईल. वयानुसार जनावरांची जोपासना याला फारच महत्व आहे. म्हणूनच वासरांची जोपासना चांगली केली तरच पुढे चांगल्या गायी, बैल आणि वळूंची निर्मिती होईल.





महाराष्ट्रातील डांगी ही गायीची जात मध्यम आकाराची व शेतीकामाच्या बैलांसाठी प्रसिद्ध असणारी जात आहे. त्यामुळे तिच्यापासून दुधाचे उत्पादन जास्त मिळत नाही. परंतु, योग्य काळजी घेतल्यास दुधाचे उत्पादनही सरासरीपेक्षा वाढलेले दिसून आले आहे. सरासरी एका वेतातील ७०० ते १००० किलो दूध उत्पादन या जातीचे आहे. अशा स्थितीत वासरांपासून ते दुभत्या जनावरांची व्यवस्था व बैलांची म्हणजेच कामाच्या जनावरांची व्यवस्था हा महत्वाचा विषय आहे.

**वासरांची जोपासना:-**

वासरांची चांगली जोपासना त्यांच्या गर्भावस्थेपासून करावी लागते. गर्भारपणाच्या शेवटच्या तीन महिन्यात गर्भाची वाढ विशेष जोमाने होत असते. त्यावेळी गायीकडे अधिक लक्ष पुरवावे लागते. अशावेळी गायी दुभत्या असल्यास त्यांचे दूध काढणे हळूहळू बंद करावे. जसे एक वेळ दूध काढून नंतर एक दिवसाआड दूध काढावे. ज्या गायी दुधात नाही त्यांना शारीरिकक पोषणासह गर्भवाढीसाठी या काळात दररोज सकाळ संध्याकाळ अर्धा किलो खुराक देणे आवश्यक आहे. यामुळे जन्मलेल्या वासराला उत्तम प्रतीचा चीक (Colostrum ) मिळेल, जो वासराची शारिरीक वाढ व आरोग्य सुरक्षित करु शकतो. शेवटच्या दोन महिन्यात गाईची खाण्याची आबाळ झाल्यास पोटातील गर्भाच्या वाढीवर दुष्परिणाम होण्याआधी गाईचीच प्रकृती ढासळते. त्यामुळे निपजणारी वासरे दुबळी आणि अशक्त असतात. अशी वासरे जन्मानंतर मृत्यूला बळी पडण्याची शक्यता अधिक असते.

**थोडक्यात :**

१. जन्मलेल्या वासरांची नाळ २ ते २॥ इंच लांब ठेऊन कापावी व आयोडीनच्या कापसासह दोरा बांधावा. राहिलेल्या नाळीचा भाग आठवड्यात आपोआप गळून पडतो.

२. वासराला सलग ४ दिवस चीक देणे आवश्यक आहे. तो वासराच्या वजनाच्या (१/१०%) प्रमाणात द्यावा. चीक नसल्यास १ अंडे ± २ औंस एरंडेल व दुस-या गायीचे दूध एकत्र करुन द्यावे.

३. वासरु जन्मल्याबरोबर प्रथम नाकपुड्या स्वच्छ कराव्यात; ज्यामुळे श्वसनक्रिया सुरळीत होते.

४. चीकाबरोबर व नंतर आठ दिवस देण्यात येणाऱ्या दुधातून वासराला रोगप्रतिबंधके व क्षार पावडर मिसळून द्यावी.

५. शक्यतो वासरांना साधारणपणे ५ ते ७ महिने स्वतंत्र ठेवावे. ज्यामुळे संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण मिळते.

६. तीन महिन्यापर्यंत सर्वसाधारणपणे वजनाच्या प्रमाणात वासराला दूध देणे आवश्यक आहे व त्यानंतर वासरांना हळूहळू दुधावरुन वैरण, हिरवा चारा व खुराक देण्यास सुरुवात करावी.

७. सहा महिन्यानंतर वासरे एकत्र बांधली तरी चालते. त्यांना या वयात शरीर वाढीसाठी खुराकासोबत खनिजे द्यावीत.

८. वासरांना शुद्ध पाणी व तेही मुबलक मिळाले पाहिजे. कमी पाण्यामुळे वासरांची भुक मंदावते.

**.कालवडीची जोपासना :-**

कालवडीचे वय हे वाढीचे वय असते; त्यामुळे त्यांना सकस आहार मिळणे अत्यंत गरजेचे असते. त्यासाठी हिरवा चारा, कोरडा चारा, ५०० ग्रॅम खुराक व खनिजे आवश्यक आहे. खनिज विटा बाजारात मिळतात, त्या गोठ्यात टांगून ठेवाव्यात. कालवडी आपल्या आवडीप्रमाणे त्या विटा चाटत असतात, त्यामुळे पाणी पिण्याचे प्रमाण व भुक वाढते. वाढीच्या वयात पुरेसे सकस खाद्य कालवडींना मिळाले तर शरीरातील सर्व भागांची वाढ योग्य प्रमाणात होते. कालवडी योग्य वजन झाल्यावर वयात लवकर त्यांची प्रजननक्षमता वाढण्यास मदत होते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती व उत्पादनक्षमताही वाढते.

**गाभण जनावरांची व्यवस्था :-**

गाय व्याल्यानंतर सुमारे ३ ते ४ महिन्यात पहिला माज दाखविते. त्यावेळी गाय भरली गेली नाही तर ती पुन्हा २१ दिवसांनी माज दाखविते. गायीचा माज २४ तास असतो. त्यावेळी उच्च उत्पादनक्षमता असलेल्या वळूच्या रेतमात्रा वापरुन कृत्रिम रेतनाद्वारे ती भरुन घेणे जरुरीचे आहे. गाय गाभण आहे किंवा नाही हे भरल्यानंतर २/३ महिन्यात तपासून सांगता येते. त्यासाठी पशुवैद्यकाकडून तपासून घेणे आवश्यक आहे. गाय गाभण आहे, असे निश्चित झाल्यानंतर तिच्या विण्याचा काळ निश्चितपणे समजू शकतो. तो साधारणतः ९ महिने ९ दिवस असतो. गाभण काळातील शेवटच्या महिन्यात अशा गायीला कळपासोबत चरावयास सोडू नये. त्यामुळे मारामारी, पाय निसटणे, इतर जनावरांचा धक्का लागून पडणे इत्यादी गोष्टी टाळता येतात. विण्यापुर्वी आठ-दहा दिवस जनावराची कास मोठी झालेली, सड ताठरलेले, मागील भाग सुजलेला, चाल जड व हळू इ. लक्षणे आढळून येतात. शक्यतो जनावराला खराब चाऱ्याची बिछायत (गादी) ठेवून, जनावर मोकळे ठेवावे. खाद्य, पाचक, हिरवाचारा, थोडा खुराक व थोडा वाळलेला चारा दिल्यास उत्तमच.

गाय व्यायल्यानंतर वासरास स्वच्छ कपड्याने / गोणपाटाने स्वच्छ करावे, त्याच्या नाकपुड्या स्वच्छ कराव्यात, नाळ कापावी, वासरास व्यायल्यानंतर ( Placenta ) ११ / २ ते २ तासांनी चीक पाजावा. जनावर व्यायल्यानंतर नैसर्गिकपणे ६/७ तासात वार पडते. व्यायल्यानंतर जनावरास गरम पाण्याने स्वच्छ धुऊन काढावे. वार पडेपर्यंत चीक काढण्यासाठी थांबू नये. गायीला सुमारे एक आठवडाभर विण्याचा खुराक (शिजवलेली बाजरी + गोडेतेल + गुळ + मेथी + मीठ इ.) द्यावा. वार आठ तासानंतर न पडल्यास पशुवैद्यकाकडे जाऊन योग्य सल्ला घ्यावा. हात घालून वार काढण्याचे अघोरी प्रयत्न करु नयेत. जीवनसत्वे तसेच पुरक क्षार यांचा पुरवठा गर्भारकाळात कमी झाला; तर असा त्रास होत असतो. ज्या जनावरांना व्याल्यानंतरही दूध येत नाही, त्यावेळी अस्टोकॅल्शियम या क्षाराच्या कमतरतेमुळे ताप येऊन जनावर दूध देत नाही.

**दुभत्या जनावरांची जोपासना :**

दुभत्या जनावरांच्या बाबतीत खालीलप्रमाणे काळजी घेणे आवश्यक आहे.

१. पिण्यास नियमीत शुद्ध व मुबलक पाणी.

२. गोठ्यातील शेण, मुत्र वेळीच काढून बसण्याच्या जागी स्वच्छता ठेवावी, ज्यामुळे स्तनदाहसोबतच इतर विविध रोग टाळता येतात.

३. जनावरांना दररोज खरारा करुन धुणे आवश्यक आहे.

४. दूध काढण्याच्या वेळा निश्चित असणे आवश्यक आहे.

५. दूध काढणारी व्यक्ती निरोगी, सशक्त, निर्व्यसनी असणे आवश्यक आहे.

६. कास व सड कोमट पाण्याने धुतल्यावरच दूध काढावे.

७. जनावराच्या खाण्यात दररोज हिरवा चारा, खुराक आणि कोरडा चारा असणे आवश्यक आहे.

८. साथीच्या रोगाचे दिवस असल्यास त्यानुसार त्या जनावरांना प्रतिबंधात्मक लस टोचून घ्यावी.

९. " स्तनदाह " झाल्यास वेळीच उपचार करुन सर्व रक्तमिश्रीत दूध काढून टाकावे.

१०. नुकत्याच व्यालेल्या जनावरांपासून दुभती जनावरे दूर बांधावी.

सरासरी २० ते २५ किलो हिरवा चारा, ६ ते ७ किलो कोरडा चारा, ७ ते ८ पेंढ्या कडबा व दुधाच्या उत्पादनाच्या ५० टक्के खुराक रोज दुभत्या जनावरास मिळाला पाहिजे.

**कामाच्या जनावरांची जोपासना :**

१. बैलास दररोज खरारा करणे अत्यंत जरुरीचे आहे.

२. कामाच्या अगोदर २/३ तास चारा द्यावा. खाल्ल्याबरोबर कामास लावू नये.

३. चारा कुट्टी करुन ३/४ वेळा द्यावा. एकाचवेळी सर्व चारा टाकून देवू नये. हिरवा चारा २० किलो, ७-८ किलो कोरडा चारा.

४. कमीत कमी ३ वेळा स्वच्छ, मुबलक पाणी पिण्यास द्यावे.

५. जड / हलके कामानुसार खुराकाचे प्रमाण कमी जास्त करावे, काम नसेल तरी दिवसाला १ किलो खुराक शरीर स्वास्थासाठी देणे आवश्यक आहे.

६. साथीच्या रोगाची लस त्या-त्या वेळेतच टोचून घ्यावी. जनावर आजारी असल्यास वेळीच उपचार करुन घ्यावा.

७. जीवनसत्वे व क्षार यांच्याअभावी रोग होऊ नये म्हणून हिरवा चारा, खनिज मीठ इत्यादींचा वापर नियमित करावा.

वरीलप्रमाणे जोपासना केल्यास जनावरांपासून फायदा निश्चितच होईल व जनावरांचे आयुष्यमान सुद्धा वाढेल.

**"सुदृढ निरोगी जनावरे हिच खरी संपत्ती असते."**

# हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाद्वारे चारा उत्पादन





**डॉ. चंद्रशेखर पाटील**
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय चिकित्सालय (स्थानिक),
बोरी ता. जि. लातूर

शेतकऱ्यांसाठी पशुधन हा उत्पन्नाचा एक महत्त्वाचा आधार आहे. परंतु, पशुधनासाठी वर्षभर हिरवा आणि पौष्टिक चारा उपलब्ध करणे, विशेषतः दुष्काळ किंवा पाण्याच्या टंचाईच्या काळात, हे एक मोठे आव्हान असते. पारंपारिक शेतीत चाऱ्याचे उत्पादन जास्त पाणी, जमीन आणि वेळ घेते. या समस्यांवर मात करण्यासाठी एक आधुनिक आणि प्रभावी उपाय उपलब्ध आहे - तो म्हणजे हायड्रोपोनिक्स (Hydroponics) तंत्रज्ञान **होय.**

हायड्रोपोनिक्स हे मातीशिवाय आणि अत्यंत कमी पाण्यात चारा (उदा. मका, गहू, बार्लीचे अंकुर) उगवण्याचे एक प्रगत तंत्र आहे. हे तंत्रज्ञान कमी जागेत आणि जलद गतीने उच्च पोषणमूल्यांचा चारा तयार करते, ज्यामुळे पशुधनाची आरोग्य आणि दूध उत्पादन क्षमता वाढण्यास मदत होते. या लेखात आपण हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचे महत्त्व, कार्यप्रणाली आणि शेतकऱ्यांसाठी असलेले फायदे याबद्दल सविस्तर माहिती घेणार आहोत.

**हायड्रोपोनिक्स चाऱ्याचे फायदे**

१. कमी जागेत, कमी पाण्यात, कमी वेळेत व स्वस्तात हिरव्या पौष्टिक चाऱ्याची निर्मिती.
२. हे तंत्रज्ञान उन्हाळा, पाणी व चारा टंचाईकाळात खूप फायदेशीर.
३. आहारात वापर केल्यामुळे पशुखाद्यावरील जवळपास २५ते ४0% खर्च कमी करता येणे शक्य.
४. दूध उत्पादन व दुधातील स्निग्धांशामध्ये वाढ.
५. चाऱ्यामध्ये खनिजे, प्रथिने, जीवनसत्व, ॲन्टीऑक्सीडंटस, फॉलिक आम्ल, ओमेगा-३ फॅटी ॲसिडस उत्तम प्रमाणात.
६. खत व रसायनाचा वापर होत नसल्यामुळे नैसर्गिक चारा मिळतो.
७. वर्षभर हिरवा चारा उत्पादन करता येते.
८. हिरव्या चाऱ्याचा कमीत कमी अपव्यय होण्यास मदत होते.
९. मजूर खर्च कमी होतो.
१०. पौष्टिक चारा उत्पादन करता येते.

### हायड्रोपोनिक्स चारा तयार करण्याची पध्दत

हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करून आपण मुख्यतः मका बियाण्यांचा वापर करून चारा निर्मिती करतो. हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञानाचा वापर करून चारा उत्पादन करत असताना बियाणे हे चांगले व उत्तम प्रतीचे, टपोरे दाणे, तसेच किमान ८०% उगवण क्षमता असलेले बुरशीमुक्त बियाणे असावे. या बियाणांवर कोणत्याही प्रकारची बीजप्रक्रिया केलेली नसावी

१. सर्वप्रथम बियाणे स्वच्छ पाण्याने धुवून ते मोड येण्यासाठी १२ ते २४ (२० तास) तास कोमट पाण्यात भिजत ठेवावे.
२. यानंतर पाण्यातून बी काढून एका सुती कापड किंवा ओल्या बारदाण्यात पुढील ४८ तास बांधून ठेवावे (जसे आपण मटकीला मोड आणतो तसे) असे केल्यामुळे बियाण्यास मोड येतात.
३. वातावरणाचा अंदाज घेवून बारदाण्यावर सकाळी व संध्याकाळी पाणी पिंपडत ते सतत ओलसर ठेवावे.
४. कोंब "फुटल्यानंतर बियाणावर ५ टक्के मिठाचे द्रावण शिंपडावे, यामुळे ओलसर असलेल्या वातावरणात वाढणाऱ्या बुरशीची वाढ होत नाही.
५. चारी बाजुने व वरून हिरवे शेडनेट लावून शेड तयार करावे. त्यामध्ये लोखंडी पट्ट्या, पाईप, ॲल्युमिनियम पाईप, प्लास्टिक पाइप यांचा वापर करून रॅक तयार करावे. या रॅकच्या आकारानुसार ट्रे ची निवड करावी.
६. बाजारामध्ये विविध आकाराचे ट्रे मिळतात ते स्वच्छ पाण्यात धुवून चांगले वाळवून घ्यावेत.
७. पूर्णपणे मोड आलेले तृणधान्य ट्रेमध्ये पसरून घ्यावे व असे ट्रे रॅकवर ठेवून द्यावेत.
८. शेडमध्ये आर्द्रता टिकून राहण्यासाठी व मोड आलेल्या बियाणावर पाणी स्प्रे करण्यासाठी फॉगर्स किंवा मायक्रोस्प्रिंकलरचा वापर करावा.
९. फॉगर्सचा वापर केल्यास प्रत्येक दोन तासाच्या अंतराने दिवसातून ७ वेळा पाणी फवारावे. पूर्ण २४ तास फॉगर्सचा उपयोग केल्यास वीज पंपाला टायमरचा वापर करावा. या ट्रेला खालील बाजूस छिद्र असतात. या छिद्रातून ट्रेमध्ये पडणारे जास्तीचे पाणी निचरा होवून निघून जाते.

अशा पध्दतीने ११ ते १२ दिवसात २० ते २५ सेमी उंचीचा हिरवा चारा तयार करता येतो. त्यातून जवळपास १० किलो हिरव्या चाऱ्याचे उत्पादन घेवू शकतो. सर्वसाधारणपणे हायड्रोपोनिक्सद्वारे उत्तम चारा उत्पादनासाठी १५ -२३ से. तापमान व ७०-८०% आद्रता आवश्यक असते. हा चारा मुळासहित जनावरांना खाण्यास दिला जातो











निसर्गपूजक असलेल्या भारतीय संस्कृतीत प्राण्यांना महत्वाचे स्थान आहे . वाघ हे दुर्गा देवीचे वाहन आहे, सरस्वती मोरावर आरूढ आहे, हत्ती हा गणपतीशी निगडीत आहे. माकड हा प्राणी तर मारुतीच्या रुपात सर्वत्र पुजला जातो. माकड म्हणजे (Rhesus Macaque) व (Bonnete macaque), तर वानर म्हणजे (Semnopithecus entellus) या प्रजाती भारतात सर्वत्र आढळतात . वानर हे बऱ्याचदा जंगलात राहतात .परंतु झुंडीने मानवी वस्तीत येऊन फळझाडांची नासधूस करतात . वानर हे शाकाहारी असून, झाडाची पानं अथवा फळं खाऊन राहतात. तर माकड हे मिश्राहारी असतात. परंतु, मानवाच्या जवळ राहिल्याने यांच्या वर्तनात बऱ्याच मोठ्या प्रमाणात बदल झालेले आढळतात. उदा. बटाट्याचे चिप्स किंवा कोल्ड्रिंक्स हे काही माकडांचे खाद्य नाही. परंतु, माकडं हे खाद्य खाताना आढळून येतात. एवढच नव्हे तर वानरसुद्धा काही ठिकाणी मानवी खाद्याला चटावलेले आढळून येतात. सुरुवातीला माणसं कुतुहलाने या प्राण्यांना खायला देतात. परंतु मानवी खाद्याची सवय लागल्यावर हे प्राणी मानवाच्या हातातील खाद्य हिसकावून घेतात. त्यासाठी प्रसंगी त्यांच्या घरात प्रवेश करतात. ते माणसावर आक्रमक होताना आढळतात. माणसाना चावतात. या प्राण्यांपासून माणसांना रोगसुद्धा संक्रमित होतात. आज अशा पद्धतीचा मानव व माकड संघर्ष बऱ्याच ठिकाणी निर्माण झालेला दिसून येतो.

# माकड / वानर संघर्ष कमी करणेसाठी शासकीय कार्यपद्धती

राज्यात मानव व माकड संघर्ष वेगवेगळ्या पद्धतीने हाताळला जात आहे. या सर्व पद्धतीत एकसूत्रता यावी व हा संघर्ष मानवीय पद्धतीने हाताळला जावा, या हेतूने शासनाने २५ नोव्हेंबर २०२५ रोजी एक शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या शासन निर्णयाद्वारे मानवी वस्तीसाठी त्रासदायक ठरणाऱ्या माकड / वानरांना जेरबंद करून सुरक्षितपणे दूर जंगलात सोडण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये मानव /वानर पकडण्याचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती अथवा संस्थांना प्रोत्साहनपार मानधनतत्वावर नियुक्त करण्याची तरतूद केलेली आहे. अशा प्रकाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीं / संस्था माकड / वानर यांना पिंजऱ्यात बंदिस्त करून अथवा बेशुद्ध करून पकडू शकतात. ज्यामुळे वर्तमान स्थितीत निर्माण झालेला मानव-माकड संघर्ष नियंत्रणात आणणे शक्य होणार आहे.



डॉ. विनया जंगले
पशुवैद्यकीय अधिकारी
संजय गांधी नॅशनल पार्क, बोरीवली

राज्यात वानर/माकड मानवी वस्तीत प्रवेश करण्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. ज्यामुळे अ-कृषक मालमत्तेचे व शेतपिकांचे नुकसान यामध्ये वाढ झाली आहे. तसेच मानव-वानर/माकड संघर्षामध्ये देखील मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या समस्येचे प्रभावी आणि मानवीय दृष्टीने व्यवस्थापन व निराकरण करण्याची निकड निर्माण झाली आहे. वानर/माकड यांना बचावाकरिता पकडण्यासाठी व त्यांना अधिवासात मुक्त करण्यासाठी, "माकड/वानर-मानव संघर्ष स्थिती हाताळण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती" महाराष्ट्र वन विभागाकडून प्रकाशित करण्यात आली आहे. त्यात उपद्रवी माकड/वानर बचावाकरिता पकडण्यासाठी व त्यांना अधिवासात मुक्त करण्यासाठी विविध पध्दती सांगितल्या आहेत. ज्यामध्ये प्राथमिकतेने बेशुध्द करण्याच्या आणि पिंजऱ्यात बचावाकरिता जेरबंद करण्याच्या पध्दतीचा अवलंब करण्याबाबत सूचविले आहे. वानर/माकड पकडण्याचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती व वनविभागाच्या बचाव पथकाद्वारे बचावाकरिता जेरबंद करून अधिवासात सोडण्याची कार्यवाही प्रचलित आहे. राज्यात एकरुपता असावी म्हणून माकड/वानर-मानव संघर्ष स्थिती हाताळण्यासाठी प्रमाणभूत प्रचलित कार्यपध्दती सोबतच माकड/वानर पकडण्याचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती/संस्था यांना मानधनावर नियुक्त करणे व एकसंघ कार्यान्वयन आणि देयक कार्यपध्दती स्थापित **व निश्चित करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. त्यानुसार,**



### कार्यान्वय प्रक्रिया

**अ. तक्रार नोंदणी** (Reporting):

- शहरी व निम-शहरी भागात मनपा /न.पा./नगरपंचायत व इतर तत्सम विकास प्राधिकरणे, तसेच ग्रामपंचायत यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील माकड/वानर- मानव संघर्षाची किंवा सदर संघर्षामुळे मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती उपलब्ध करून दिल्यानंतर, संबंधित वन परिक्षेत्र अधिकारी (RFO) घटनेची सत्यता तपासेल व स्थानिक वनरक्षकामार्फत उपद्रवी माकड/वानर यांची संख्या निश्चित करुन उपद्रव व्याप्त क्षेत्राचा तपशिल, तारीख व नुकसानीचे स्वरुप यासारखे तपशील नोंदवून अहवाल संबंधित वन उपविभागाचे सहायक वनसंरक्षक यांना सादर करतील.
- सहाय्यक वनसंरक्षक हे संबंधित विभागाचे उप वनसंरक्षक व आवश्यकता भासल्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचेशी विचारविनिमय करून माकड/वानर बचावाकरिता पकडण्यासाठी व उपचारानंतर त्यांना अधिवासात मुक्त करण्यासाठी क्षेत्राचा तपशील व माकड/वानर संख्या असलेले लेखी निर्देश पारित करतील. तथापि, हे करतांना वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ११ व १२ मधील तरतुदींचा, महाराष्ट्र वन्यजीव (संरक्षण) नियम-२०१४ मधील नियम ९ व १० मधील तरतुदींचा व मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

**ब. नेमणूक** (Deployment):

- वन विभागात विभागीय स्तरावर प्रशिक्षित बचाव पथकाची नेमणूक माकड/वानर बचावासाठी करण्यात यावी.
- प्रशिक्षित माकड पकडणारे व्यक्ती/संस्था यांची अधिकृत यादी प्रत्येक विभागात तयार करून ठेवण्यात यावी व त्यामधील व्यक्ती/संस्था यांची नेमणूक विशिष्ट प्रकरणासाठी संबंधित वनपाल वनसंरक्षक यांच्या देखरेखीखाली करण्यात येईल.
- माकड पकडणाऱ्या व्यक्ती/संस्था या प्रशिक्षित असाव्यात याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. सदर व्यक्तीस दुखापत झाल्यास याबाबतची कोणतीही जबाबदारी वन विभागाची राहणार नाही.
- केवळ जाळी, पिंजरे यांसारख्या सुरक्षित व गैर-दुखापतकारक पध्दतीचा वापर उपद्रवी माकड/वानर पकडण्यासाठी करावा.

**क. पकडणे -सोडणे (Capture & Release):**

- बचावासाठी पकडलेल्या प्रत्येक माकडाचा/वानराचा फोटो किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करण्यात यावा.
- उपचारानंतर माकडांना/वानरांना मानवी वस्तीपासून दूर (शक्यतो १० किमी पेक्षा जास्त अंतरावर) वन परिक्षेत्र अधिकारी यांनी निश्चित केलेल्या वनक्षेत्रात सोडले जाईल.
- सोडण्याची कार्यवाही संबंधित वन परिक्षेत्र अधिकाऱ्याच्या उपस्थितीत केली जाईल.
- "मुक्तता प्रमाणपत्र" (Release Certificate) तयार केले जाईल आणि त्यावर देखरेख करणाऱ्या वन अधिकारी तसेच माकड/वानर पकडणाऱ्यांची स्वाक्षरी असेल.
- माकड/वानर पकडणाऱ्याची देयके अदा करण्यासाठी माकड/वानर बचावाकरिता पकडण्याची नोंदवही वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात ठेवली जाईल.



## ३. पेमेंट प्रोटोकॉल


**अ. आर्थिक मापदंड (Rate)**

माकड/वानर पकडणाऱ्या प्रशिक्षित व्यक्ती कमी असल्याने व त्या प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध नसल्याने त्यांना पकडण्यासाठी दूरच्या ठिकाणी जाणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे असणे आवश्यक आहे. जेणेकरुन, कार्यवाही वेळेत पूर्ण करुन संघर्षाच्या घटना वेळेत प्रतिसाद देणे शक्य होईल. सदर प्रकरणी प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आला आहे.

- १० पर्यंत माकड/वानर सुरक्षितपणे पकडल्यास व सोडल्यास रु. ६०० प्रती माकड
- १० पेक्षा जास्त : रु. ३०० प्रती माकड/वानर
- एकावेळी एका प्रकरणात देण्यात येणारे आर्थिक सहाय्य रु. १०००० पेक्षा जास्त नसेल.
- माकड/वानर संख्या १ ते ५ असल्यास पकडणाऱ्या प्रशिक्षित व्यक्तीस रु. १००० प्रवास खर्च अनुज्ञेय असेल. सदर संख्या ५ पेक्षा जास्त असल्यास वेगळ्याने प्रवास खर्च अनुज्ञेय असणार नाही.

प्रस्तुत प्रकरणी प्रचलित वित्तीय नियमांचे पालन करून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी माकड/वानर पकडण्याबाबत आवश्यक ती नियमोचित निविदा प्रक्रिया राबवून आवश्यकतेनुसार दरांमध्ये सुधारणा करण्यात येईल.

# '१९६२-MVU महाराष्ट्र चॅटबॉट'
# महाराष्ट्र पशुसंवर्धन क्षेत्रातील डिजिटल क्रांती




पशुसंवर्धन विभागात महाराष्ट्रातील पशुपालकाला डिजिटल युगाशी जोडणाऱ्या एका महत्त्वपूर्ण आणि अभिनव उपक्रमाची नुकतीच प्रायोगिक तत्वावर सुरुवात झाली आहे. '१९६२-MVU महाराष्ट्र चॅटबॉट' या नाविन्यपूर्ण डिजिटल व्यासपीठाच्या माध्यमातून सध्या राज्यातील पशुपालकांना अत्याधुनिक व सुलभ पशुवैद्यकीय आरोग्यसेवा उपलब्ध करून देत आहे. BFIL आणि इंडसइंड बँक (CSR उपक्रम) यांच्या सहकार्याने, तसेच महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या सक्रिय भागीदारीतून हे व्यासपीठ विकसित करण्यात आले आहे.

### देशातील १ ला WhatsApp-आधारित टेलीकन्सल्टेशन उपक्रम

'१९६२-MVU महाराष्ट्र चॅटबॉट' हा भारतातील पशुसंवर्धन क्षेत्रातील पाहिलाच डिजिटल उपक्रम आहे, जो पशुपालकांसाठी गेम चेंजर ठरणार आहे. या उपक्रमाद्वारे पशुपालकांना मोफत टेलीकन्सल्टेशन सेवा उपलब्ध होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ही सेवा अत्यंत सोप्या आणि सुपरिचित अशा WhatsApp-आधारित इंटरफेसद्वारे पुरवली जाईल. पशुपालक व्हिडिओ, ऑडिओ आणि टेक्स्ट मेसेजद्वारे थेट पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधून सल्ला घेऊ शकतात. यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना वेळेवर करणे शक्य होणार आहे.

### आरोग्यसेवा सुलभता आणि पशुपालकांचा सहभाग

या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट हे आहे की, पशुपालकांचा सहभाग अधिकाधिक वाढावा आणि त्याचबरोबर पशुवैद्यकीय आरोग्यसेवा त्यांना अधिक सुलभ व्हावी. एका सोप्या, वापरकर्ता-अनुकूल डिजिटल अनुभवातून आरोग्यसेवेतील अडथळे दूर करणे हे यामागचे सूत्र आहे. यामुळे ग्रामीण भागातील पशुपालकांना त्यांच्या पशुधनासाठी वेळेवर आणि योग्य मार्गदर्शन घेणे सहज शक्य होणार आहे.

**मुख्य वैशिष्ट्ये:**


**सर्वसमावेशक डिजिटल अनुभव**

चॅटबॉटमध्ये अनेक महत्त्वाची वैशिष्ट्ये समाविष्ट आहेत, ज्यामुळे पशुपालकांना सर्वसमावेशक डिजिटल अनुभव मिळणार आहे. जसे की,

- **व्हिडिओ व ऑडिओ टेलीकन्सल्टेशन :** पशुवैद्यकीय डॉक्टरांशी थेट व्हिडिओ किंवा ऑडिओ कॉलद्वारे संपर्क साधून पशुंच्या आरोग्याबाबत चर्चा करता येईल.
- **ऑडिओ मार्गदर्शन:** उपचारांसंबंधी आणि व्यवस्थापनासंबंधी ऑडिओ स्वरूपात माहिती व सूचना उपलब्ध करण्यात येईल.
- **डॉक्टर चॅट:** तातडीच्या प्रश्नांसाठी डॉक्टरांशी मजकूर (Text) आधारित संवाद साधण्याची सोय यामध्ये उपलब्ध असेल.
- **रुग्णालय यादी:** जवळील पशुवैद्यकीय रुग्णालये किंवा केंद्रांची माहिती उपलब्ध.
- **आरोग्य योजना माहिती:** शासनाच्या विविध पशुसंवर्धन आणि आरोग्य योजनांची अद्ययावत माहिती उपलब्ध होईल.
- **नेहमी विचारले जाणारे प्रश्न (FAQs):** पशुआरोग्य व व्यवस्थापनाशी संबंधित सामान्य प्रश्नांची उत्तरे एकाच ठिकाणी मिळतील.

**प्रासंगिक, विश्वासार्ह आणि डिजिटल आरोग्यसेवा**

'१९६२-MVU महाराष्ट्र चॅटबॉट' हा महाराष्ट्राच्या पशुसंवर्धन विभागाच्या वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या उपक्रमाने खऱ्या अर्थाने पशुपालकांना वेळेवर, विश्वासार्ह आणि डिजिटल आरोग्यसेवा त्यांना आधुनिक साधनांच्या माध्यमातून चुटकीसरशी उपलब्ध करून दिली आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या पशुपालकांना सक्षम बनवण्याचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य आहे. पशुपालकांनी या डिजिटल क्रांतीचा भाग होण्यासाठी व मोफत सेवांचा लाभ घेण्यासाठी त्वरित QR कोड स्कॅन करून चॅटबॉटशी कनेक्ट व्हावे.




**QR कोड स्कॅन करून चॅटबॉटशी कनेक्ट व्हा!**

कॉलसेंटरकडे दि. ३१.१०.२०२५ पर्यंत राज्यातून १३ लाख २७ हजार ८०८ पशुपालकांनी संपर्क साधला होता. त्यापैकी सध्या कार्यरत असलेल्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांमार्फत ६ लाख ७३ हजार ६७२ पशुंना पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यात आलेल्या आहेत. १ लाख ११ हजार ८३५ पशुपालकांना पशुआरोग्य, पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना या विषयी मार्गदर्शन तसेच सल्ला देण्यात आलेला आहे.

# पशुसंवर्धन शब्दसंग्रह

हा केवळ शब्दांचा संग्रह नसून, विद्यार्थ्यांना पशुसंवर्धन, प्राणिशास्त्र, कृषीशास्त्र व ग्रामीण विकास या विषयांतील तांत्रिक शब्द समजून घेण्यास मदत करेल. स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने, विविध शासकीय योजनांशी संबंधित प्रश्नांमध्ये या क्षेत्रातील तांत्रिक संज्ञा वारंवार विचारल्या जातात. व्यवसायिक दृष्टीने, पशुपालक, दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी, पशुवैद्यक आणि संशोधक यांच्यासाठी हा शब्दसंग्रह एक प्रकारचा मार्गदर्शक आहे. याच्या साहाय्याने ते पशुपालनाशी संबंधित आधुनिक तंत्रज्ञान, आरोग्य व्यवस्थापन, प्रजनन, आहार व विपणन याबाबत सखोल ज्ञान आत्मसात करू शकतात. थोडक्यात, “पशुसंवर्धन शब्दसंग्रह” पशुपालकांमध्ये अधिकाधीक जागरुकता निर्माण करुन त्यांना स्पर्धात्मक युगात एक आश्वासक दृष्टीकोन प्रदान करेल.

| अ. क्र. | इंग्रजी शब्द / Term | मराठी अर्थ / स्पष्टीकरण |
|---|---|---|
| १ | Sex separate feeding | नर आणि मादी पक्ष्यांना वेगवेगळा आहार देणे |
| २ | Protein percentage | आहारातील प्रथिनांचे प्रमाण |
| ३ | Nest box | अंडी देण्यासाठी ठेवलेले घरटे |
| ४ | Broodiness | मादी पक्ष्याची अंडी ऊबवण्याची प्रवृत्ती |
| ५ | Egg collection | अंडी गोळा करण्याची प्रक्रिया |
| ६ | Hatchery | अंडी उबवण्याचे केंद्र |
| ७ | Livability | जीवितता – ठराविक कालावधीत जिवंत राहण्याचे प्रमाण |
| ८ | Target body weight | लक्षित शरीर वजन |
| ९ | Feed conversion ratio (FCR) | आहार रूपांतरण गुणोत्तर – अन्नाचे शरीरवजनात रूपांतर |
| १० | Skeletal frame | शरीराची हाडांची रचना |
| ११ | Pre-breeder feed | अंडी देण्यापूर्वी दिला जाणारा विशेष आहार |
| १२ | Layer breeder feed | अंडी उत्पादनासाठी दिला जाणारा आहार |
| १३ | Broiler breeder feed | मांसासाठी ब्रीडर पक्ष्यांना दिला जाणारा आहार |
| १४ | Feed restriction | आहार मर्यादित ठेवण्याची पद्धत |
| १५ | Overcrowding | गर्दी – जास्त पक्षी कमी जागेत ठेवणे |
| १६ | Light intensity | प्रकाशाची तीव्रता |
| १७ | Hatchery hygiene | उबवणी केंद्रातील स्वच्छता व्यवस्थापन |
| १८ | Body condition | पक्ष्याची शारीरिक स्थिती – वजन, स्नायू, आरोग्य |
| १९ | Mortality rate | मृत्युदर – ठराविक काळात मरणाऱ्या पक्ष्यांचे प्रमाण |
| २० | Performance goal | उत्पादन उद्दिष्ट – अपेक्षित अंडी, पिल्ले, वजन इ. |

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

# महापशुधन वार्ता



प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

वर्ष १ ले, अंक ८ वा, डिसेंबर-२०२५